POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक -९५ ● मुंबई, शुक्रवार, ०७ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA




## बीएमसीच्या महिला आरक्षण सोडतीची तारीख जाहीर...

**निवडणूक तयारीचा प्रारंभ**

बीएमसीकडून करण्यात आलेली ही घोषणा मुंबईतील महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या औपचारिक तयारीचा प्रारंभ मानली जात आहे. देशातील सर्वाधिक श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बीएमसी साठी डिसेंबर २०२५ मध्ये निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांपूर्वी शहराच्या कारभारावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांनी आपली तयारी सुरु केली आहे. नागरिकांना आरक्षण प्रक्रियेबाबतची माहिती आणि कार्यालयांचे तपशील बीएमसीच्या अधिकृत वेबसाइटवर किंवा सार्वजनिक अधिसूचनेत दिलेल्या ईमेल संपर्कांद्वारे पाहता येतील.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने येत्या २०२५ च्या महापालिका निवडणुकीपूर्वी महिला आरक्षणासाठीची सोडत जाहीर केली आहे. या प्रक्रियेद्वारे महिलांच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि सामान्य प्रवर्गासाठी राखीव जागा निश्चित केल्या जाणार आहेत.

**वांद्रे येथे सोडत प्रक्रिया :** मुंबई महानगरपालिकेतील महिला आरक्षणाची सोडत वांद्रे (पश्चिम) येथील बालगंधर्व रंगमंदिरात मंगळवार दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता काढण्यात येणार आहे. सोडतीनंतर आरक्षणाचा अंदाजे मसुदा जाहीर केला जाईल. नागरिकांना त्यावर आक्षेप व सूचना नोंदवण्यासाठी १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. नागरिक आपले आक्षेप किंवा सूचना मुंबईतील नेमून दिलेल्या बीएमसी कार्यालयांमध्ये सादर करू शकतात. सर्व नोंदींचे परीक्षण केल्यानंतर अंतिम आरक्षण यादी जाहीर करण्यात येईल.

**पारदर्शकता आणि नागरिकांचा सहभाग :** पालिकेने आपल्या अधिसूचनेत पारदर्शकता आणि सार्वजनिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. नागरिकांनी आरक्षण मसुदा काळजीपूर्वक पाहून वेळेत आपले अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन बीएमसीने केले आहे. बीएमसीच्या प्रत्येक प्रशासकीय विभागासाठी नियुक्त अधिकारी व कार्यालय निश्चित करण्यात आले असून, संबंधित पत्ते, ईमेल आयडी आणि संपर्क क्रमांक सार्वजनिक करण्यात आले आहेत. दक्षिण मुंबईपासून उपनगरांपर्यंत सर्व नागरिकांना अभिप्राय नोंदवण्यासाठी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## ४३ची घरं ५० लाखांची सांगून... म्हाडाच्या नागपूर मंडळातील घोटाळा!

**■मुंबई। प्रतिनिधी,**

म्हाडाच्या नागपूर मंडळातील विक्रीवाचून रिक्त राहिलेल्या घरांची विक्री करण्यासाठी मंडळाकडून एका कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र या कंपनीने अर्जदार आणि म्हाडाची आर्थिक फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. या कंपनीविरोधात बर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. ही कंपनी कोकण मंडळातील घरांच्या विक्रीसाठीही नियुक्त असल्याचे समोर आल्याने कोकण मंडळासाठीची नियुक्तीही




अर्जदारांकडून घरांची २५ टक्के रक्कम घेतल्यानंतर ती नागपूर मंडळाच्या खात्यात जमा करणे त्यात ही रक्कम जमा करून व्याज बंधनकारक होते. असे असताना या कंपनीने एक नवीन खाते उघडून मिळवल्याचे स्पष्ट झाले. दुसरीकडे फसवणूक केल्याचेही समोर आले. ४३ लाखांचे घर ५० लाखांचे असल्याचे सांगत अर्जदारांची फसवणूक केली आहे.

रद्द करण्यात आल्याची माहिती म्हाडा प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

**पुन्हा निवदा भरल्यानंतर नियुक्तीही झाली**

घरे विकण्यासाठी अनेक पर्याय म्हाडा प्राधिकरणाने आणले. त्यात खासगी कंपनीची नियुक्ती करून त्यांच्या माध्यमातून घरे विकण्याचा पर्याय होता. या पर्यायानुसार नागपूर मंडळाने नियुक्त केलेल्या कंपनीमध्ये ज्या कंपनीचा समावेश होता, त्यात आपली फसवणूक केली जात असल्याच्या तक्रारी २०२४ पासून येत होत्या. मात्र कंपनीविरोधात कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यानंतर २०२५ साठी पुन्हा कंपनीच्या नियुक्तीसाठी निविदा काढण्यात आली असता त्यात या कंपनीनेही निविदा भरली आणि या कंपनीची नियुक्तीही झाली. दरम्यान, या कंपनीविरोधात तोपर्यंत १६ तक्रारी दाखल झाल्या होत्या. काही महिन्यांपूर्वी नागपूर मंडळाचे मुख्य अधिकारी म्हणून पदभार स्वीकारलेल्या विजय इंगोले यांनी तपास केला असता कंपनीने अर्जदारांची आणि नागपूर मंडाळाची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले.

**एक कोटी रुपये वसूल**

नागपूर मंडळाने आता रिक्त घरांच्या विक्रीची सर्व प्रक्रिया संगणकीय केली आहे. तसेच ज्या तक्रारदारांचे पैसे कंपनीने घेतले होते, त्या तक्रारदारांना घरांचा ताबा देण्यात आला असून कंपनीकडून एक कोटी रुपये वसूल केले आहेत.

## हुक्का पार्लरवर पोलिसांची धडक कारवाई

### मुंबई गुन्हे शाखकडून ३ कोटींचे निकोटिनयुक्त फ्लेवर्स जप्त

**■मुंबई। प्रतिनिधी,**


अवैध पद्धतीने निकोटिनयुक्त फ्लेवर्सचा पुरवठा करणाऱ्या हुक्का पार्लरवर मुंबई गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. मुंबईतील उमरखाडी येथे एका गोदामावर छापा टाकून पोलिसांनी तब्बल ३ कोटींपेक्षा अधिक किंमतीचा मोठा साठा जप्त केला. बंदी असलेल्या या हुक्का फ्लेवर्सची विक्री मुंबईमध्ये काही हुक्का पार्लरमध्ये गुप्तपणे सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 'एसक्युब डिस्ट्रीब्युशन एजन्सी एलएलपी' या कंपनीकडून परदेशी 'अल बखर' या ब्रँडचे निकोटिनयुक्त फ्लेवर्स आयात केले जात होते. महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये तसेच मुंबईतील अनेक हुक्का पार्लरमध्ये मागणीप्रमाणे हे फ्लेवर्स अवैध पद्धतीने पुरवले जात होते. उमरखाडी येथील गोदामात हा प्रकार सुरू असल्याचे पोलिसांना समजताच त्यांनी गोदामावर छापा टाकला.

या छाप्यात १,८३१ बॉक्स निकोटिनयुक्त हुक्का फ्लेवर्स जप्त करण्यात आले. ज्याची एकूण किंमत ३ कोटींहून अधिक होती. या प्रकरणी पोलिसांनी सचिन सुशीलकुमार सुरी (वय ४९) याला ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या कोणत्याही पॅकेटवर Health Warning नव्हती, अशी माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी डोंगरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चाचणीदरम्यान मोनोरेलला अपघात नवीन गाडीच्या डब्याचे नुकसान



**सुरक्षित सेवा पुरविण्यास कटिबद्ध असल्याचा दावा**

या केवळ अंतर्गत तांत्रिक चाचण्या आहेत. मोनोरेलच्या दैनंदिन सेवा सुरू करण्यापूर्वी प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या चाचण्या सुरू आहेत. 'मेधा एसएमएच रेल कंपनी'मार्फत या नियमित चाचण्या सुरू आहेत. प्रवाशांची गैरसोय कमी व्हावी यासाठी काही चाचण्या सुट्टीच्या दिवशीदेखील पार पाडल्या जात आहेत. 'एमएमएमओसीएल' मुंबईकरांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सार्वजनिक परिवहन सेवा पुरविण्यास कटिबद्ध असल्याचे 'एमएमएमओसीएल'ने म्हटले आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मोनोरेलमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याने ही सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आली आहे. सध्या मोनोरेलच्या कार्यक्षमतेत आणि सुरक्षिततेत वाढ करण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार मोनोच्या ताफ्यात दाखल झालेल्या नवीन गाड्यांची चाचणी सुरू आहे. बुधवारी सकाळी मोनोच्या चाचणीदरम्यान वडाळा डेपो मोनोरेल स्थानकाजवळ सिग्नल यंत्रणेतील बिघाडामुळे अपघात झाला. मोनोमध्ये प्रवासी नसल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र, या अपघातामध्ये नवीन गाडीच्या डब्याचे अतोनात नुकसान झाले. या घटनेमुळे मोनोच्या दुर्घटनांची मालिका सुरूच असल्याचे दिसून आले आहे.

मोनोरेलमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने अनेकदा प्रवासी गाड्यांमध्ये अडकून पडल्याच्या घटना घडल्या होत्या. सतत होणाऱ्या या घटनांच्या पार्श्वभूमीवर 'एमएमआरडीए'ने मोनोची संपूर्ण मार्गावरील सेवा २० सप्टेंबरपासून अनिश्चित काळासाठी बंद केली आहे. मोनोचे संचालन करणाऱ्या 'महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड'ने (एमएमएमओसीएल) मोनोरेलमध्ये नवीन सिग्नल प्रणाली, नवीन मोनोगाड्या आणि तंत्रज्ञान आणण्याचे काम हाती घेतले आहे.

मोनोरेलच्या कार्यक्षमतेत आणि सुरक्षिततेत अधिक वाढ करण्यासाठी अत्याधुनिक 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) सिग्नलिंग प्रणालीची चाचणी सध्या सुरू आहे. या प्रणालीची अंमलबजावणी प्रकल्पाचे नियुक्त कंत्राटदार 'मेधा एसएमएच रेल कंपनी' करत आहे.

मोनोच्या ताफ्यात आलेल्या नवीन गाड्यांच्या चाचण्यांदरम्यान बुधवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास मोनोला अपघात झाला. सदोष सिग्नल यंत्रणेमुळे नियंत्रण कक्षाला गाडीचे स्थान ओळखता आले नाही. त्यामुळे गाडी दुसऱ्या रुळावर गेली. यावेळी गाडी गाईडवे बीमवर जाऊन धडकली. यामध्ये नवीन गाडीचे मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि 'एमएमएमओसीएल'चे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

अपघातावेळी गाडीमध्ये दोन तांत्रिक कर्मचारी आणि मोनोरेल ऑपरेटर कार्यरत होते. त्यांना अग्निशमन दलाच्या जवानांनी गाडीतून खाली उतरवले. यामध्ये मोनोरेल ऑपरेटरच्या डोक्याला मार लागला आहे, तर इतर कर्मचारी सुरक्षित आहेत. या घटनेमुळे मोनोच्या सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## बिल्डर दाम्पत्याची हेराफेरी, १ फ्लॅट २ जणांना विकले

### तब्बल १०२ खरेदीदारांची १०० कोटींना फसवणूक

**■मुंबई। प्रतिनिधी,**

घर खरेदी हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अतिशय महत्त्वाचा निर्णय असतो. आयुष्यभराची कमाई लोक यासाठी लावत असतात. मात्र मुंबईत फ्लॅट खरेदी करताना सावधानता बाळगणं गरजेचं आहे, हे पुन्हा एकदा एका प्रकरणावरुन समोर आलं आहे. वडाळा (पश्चिम) येथील कात्रक रोडवर असलेल्या 'स्काय ३१' या गृहनिर्माण प्रकल्पातील १०२ फ्लॅट खरेदीदारांची तब्बल १०० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. एका चार्टर्ड अकाउंटंटच्या तक्रारीवरून पोलिसांनी बिल्डर दाम्पत्याविरुद्ध आणि त्यांच्या कंपनीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

**बिल्डर जोडप्याविरुद्ध गुन्हा दाखल**

तक्रारदार अनिल मोहनलाल द्रोण (६२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बिल्डर सुब्बारामन आनंद विलायनूर, त्यांची पत्नी उमा सुब्बारामन आणि त्यांची कंपनी बीपी गंगर कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांनी २०१८ पासून फ्लॅट विकण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपये वसूल केले.



**मुंबईतील अलिकडच्या काळातली पहिलीच घटना**

एका इमारतीत एका बांधकाम व्यावसायिकाने दोन-चार लोकांना फसवल्याची प्रकरणे अधूनमधून समोर येत असतात, परंतु अलिकडच्या काळात, मुंबईत एकाच इमारतीत १०० हून अधिक लोकांना फसवल्याची ही पहिलीच घटना आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. खरेदीदारांचे पैसे कुठे आणि कसे वापरले गेले हे शोधण्यासाठी पोलिस आता आरोपींचे आर्थिक व्यवहार, बँक खाती आणि मालमत्ता तपासत आहेत.

पोलिस तपासात समोर आले आहे की, आरोपींनी खरेदीदारांकडून मिळालेले पैसे इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्याऐवजी, त्यांनी या पैशांतील मोठा हिस्सा त्यांच्या वैयक्तिक खात्यात आणि त्यांच्या संलग्न कंपन्यांच्या खात्यात हस्तांतरित केला आणि त्यातून नफा कमावला. एवढंच नाही तर त्यांनी एकच फ्लॅट दोन वेगवेगळ्या व्यक्तींना विकला, त्यांच्याकडून पैसे घेऊन दोन्ही व्यक्तींची फसवणूक केली. या प्रकरणात, पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४०६ (गुन्हेगारी विश्वासघात) आणि ३४ (सामान्य गुन्हा) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## देशासह राज्यावर संकट

### तब्बल इतक्या जिल्ह्यांना अलर्ट, ३ दिवस धोक्याची...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सतत पाऊस हजेरी लावताना दिसतोय. नोव्हेंबर महिना उजाडला असूनही पाऊस काही थांबण्याचे नाव घेत नाही. फक्त राज्यातच नाही तर देशभरात पाऊस सुरू आहे. त्यामध्येच आता भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा दिला. मोंथा चक्रीवादळानंतर अजून एका चक्रीवादळाचा इशारा सध्या देण्यात आला. यामुळे पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम असेल.

नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच देशातील हवामानात लक्षणीय बदल होतोय. भारतीय हवामान विभागाने एक इशारा जारी केला आहे की, पश्चिमी विक्षोभ सक्रिय झाल्यामुळे देशाच्या अनेक भागात पाऊस आणि वादळे येऊ शकते. 5 ते 8 नोव्हेंबर दरम्यान उत्तराखंड, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल या अनेक भागात पाऊस पडण्याची शक्यता आहे.




रत्नागिरी, सांगली, सातारा, आहिल्यानगर, पुणे या भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल. बीड, नांदेड, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, परभणी, ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण असेल आणि विजांचा कडकडाटासह पाऊस होईल. राज्यातील इतरही जिल्ह्यांमध्ये पाऊस हजेरी लावण्याचे संकेत आहेत. यादरम्यान वारेही वेगाने वाहून लागेल.

## एवढी बॅग मंगळुरूला एका व्यक्तीला द्या... मुंबईतल्या व्यक्तीने बस ड्रायव्हरला दिली बॅग, उघडून बघताच पोलीस हादरले

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईवरून मंगळुरूला जाणाऱ्या एका बसमधून पोलीसांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम हस्तगत केली आहे. पोलीसांनी उत्तर कन्नड जिल्ह्यातील भटकळमधून ४०१ ग्रॅम वजनाच्या ३२ सोन्याच्या बांगड्या आणि ५० लाख रूपयांची रोकड पकडली आहे. वाहनांच्या तपासणीदरम्यान ही रक्कम आणि सोने जप्त करण्यात आले आहे. आता या प्रकरणी भटकळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीसांनी या घटनेचा तपास सुरु केला आहे.

**अनोळखी व्यक्तीने दिली होती बॅग**



**तपासणी दरम्यान सापडली बॅग**

भटकळमध्ये पोलीस वाहनांची तपासणी करत होते. ही बस तिथे पोहचताच या बसची तपासणी करण्यात आली. यावेळी पोलीसांना सुटकेसमध्ये मिठाईच्या पेट्यांसारखे पॅक केलेले बॉक्स आढळले. ज्यावेळी पोलीसांनी या पेट्या उघडल्या तेव्हा त्यात रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने आढळले. त्यानंतर पोलीसांनी हा सर्व मद्देमाल जप्त केला असून या मालमत्तेचा खरा मालक कोण आहे याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेच्या तपासादरम्यान पोलीसांना धक्कादायक माहिती मिळाली आहे. बसच्या चालकाने सांगितले की, 'ही बॅग त्याला एका अनोळखी व्यक्तीने दिली होती. बॅग देताना त्या व्यक्तीने चालकाला सांगितले होते की, मी बस नंबर सांगतो, त्यानंतर आमचे लोक ही बॅग घ्यायला येतील. बॅग घेणाऱ्या व्यक्तीचे नाव इरफान असेल.'

**जंगलात दारू घेऊन जाताना तस्करांना पकडले**

कारवार तालुक्यातील मांगिनी परिसरात पोलीसांनी लाखो रुपयांची गोवा दारू जप्त केली. ही दारू आरोपी तस्कर डोक्यावर पोत्यात भरून जंगलात घेऊन जात होते. या प्रकरणात कारवारमधील चितकुल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार मुख्य रस्त्यावर पोलीस तपासणी करतात, त्यामुळे हे लोक सायंकाळच्या वेळी दारूचे बॉक्स जंगलातून घेऊन जात होते. चितकुलचे पीएसआय परशुराम आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केला आहे. या कारवाईत दिलीप म्हाळसेकर, राजेंद्र पडवळकर आणि गणपती गलगुटकर यांना अटक करण्यात आली. हे सर्वजण कारवारचे रहिवासी आहेत. या तिघे 1 लाख ३४ हजार ४८२ रुपए किमतीची दहापेक्षा जास्त ब्रँडच्या गोवा बनावटीच्या दारूची तस्करी करत होते. आता त्यांना ताब्यात घेण्यात आले असून अधिक तपासणी सुरु आहे.

## एक रुपयाची चूक अन् १ लाख २२ हजारांचा भुर्दंड, पाहा कसं गंडवलं?

**मोबाइलवर मेसेज**

टेलरने केलेल्या तक्रारीत १ ऑक्टोबरच्या रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी त्याच्या मोबाइलवर बँक ऑफ इंडियाच्या नावाने BOIUPI.TXT असा मेसेज आला. त्याने तो मेसेज उघडला आणि बंद केला. त्यातून काहीही घडले नाही. दोन दिवसांनंतर म्हणजे ३ ऑक्टोबर रोजी, पहाटे १ वाजून १५ मिनिटांनी त्याला बँकेकडून आणखी एक मेसेज आला. त्यात त्याला त्याच्या खात्यातून १ रुपयाचा व्यवहार झाल्याचे लिहिले होते. १ रुपया ही खूपच कमी रक्कम असल्याने त्याने तो मेसेज वाचला आणि त्यात काय एवढे म्हणत दुर्लक्ष केले.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

बँकांच्या नावाने मोबाइल फोनवर मेसेज येणे यात काहीच नावीण्य उरलेले नाही. आजकाल अनेक बँकांकडून मेसेज केवळ रटर द्वारेच नव्हे तर WhatsApp नेही पाठवले जातात. त्यामुळे जर एखादा सायबर फसवणूक करणारा बँकेच्या नावाने मेसेज पाठवतो तेव्हा ते मेसेज खरे की खोटे, हे ठरवणे खूप अवघड जाते. काही लोक असे मेसेज खरे समजून त्यावर क्लिक करतात आणि सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात सापडतात. ताडदेवमधील एका टेलरसोबत नेमके असेच घडले. त्याची ही एक चूक त्याला १ लाख २२ हजार रुपयांना पडली.

**खात्यातून १७ व्यवहार**

काही तासांनंतर टेलरच्या खात्यातून १७ वेगवेगळे ऑनलाइन व्यवहार झाले आणि त्याच्या खात्यातून १ लाख २२ हजार १३६ रुपये




काढण्यात आले. हे सर्व मेसेज पाहून त्याला जबर धक्का बसला. त्याने ही माहिती एका ओळखीच्या व्यक्तीला सांगितली तेव्हा त्याने १९३० या सायबर हेल्पलाइन क्रमांकावर तक्रार दाखल करण्यास सांगितले. तशी तक्रार केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे तो झारखंडमधील त्याच्या घरी गेला. तिथून परतल्यानंतर त्याने बुधवारी (५ नोव्हेंबर) मुंबई पोलिसांकडे तक्रार दाखल केली. ताडदेव पोलिसांच्या म्हणण्यानुसार BOIUPI.TXT हा मेसेज सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीचा भाग असू शकतो. अशा लिंक पाठवून, सायबर गुन्हेगार बँकिंग ग्राहकांच्या मोबाइल नंबरवर रिमोट ॲक्सेस मिळवतात आणि त्यांची सर्व बँक आणि वैयक्तिक माहिती चोरतात. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी लोकांना आवाहन केले आहे की, त्यांनी बँकेच्या नावाने कोणतीही अज्ञात लिंक किंवा मेसेज घाईघाईत उघडू नये, परंतु काळजीपूर्वक विचार केल्यानंतरच आणि सायबर फसवणूक झाल्यास त्वरित १९३० या क्रमांकावर तक्रार करावी.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आल्या निवडणुका...होतील निवडणुका...




**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अखेर जाहीर झाल्या आहेत. या निवडणुका स्थानिक प्रश्नांवर होणे अपेक्षित असते. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. स्थानिक पातळीवरही आपलेच नियंत्रण राहावे, यासाठी राज्य आणि केंद्र पातळीवरुन हस्तक्षेप होत असतात.**

अखेर बहुप्रतिक्षित स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा पहिला टप्पा मंगळवारी जाहीर झाला. २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींचे मतदान २ डिसेंबरला पार पडून दुसऱ्या दिवशी निकाल लागेल. या निवडणुका स्थानिक प्रश्नांवर व्हाव्यात अशी अपेक्षा असते. पण तसे होणे राजकीयदृष्ट्या सोईचे नसते. स्थानिक प्रश्न, उदा. कचरामुक्ती, स्वच्छ आणि पुरेसा पाणी पुरवठा, दजेर्दार रस्ते, प्रदूषण नियंत्रण, कार्यक्षम प्रशासन, आवश्यक नागरी सुविधांची उपलब्धता यावर निवडणूका व्हायला हव्यात. या मुद्द्यांवर नागरिक समाधानी आहेत का, याचे सर्वेक्षण केले तर एकाही गावात अनुकूल मते व्यक्त होण्याची शक्यता दुरापास्त. याउपर राज्य सरकार कसे आहे, वरिष्ठ नेते कसे आहेत, त्यांच्या भूमिका काय आहेत या भोवती निवडणूक फिरण्याची शक्यता अधिक. ते होऊ देणे प्रमुख राजकीय पक्षांनाही सोईचे असते. शेवटी निकाल लागेल तेव्हा राज्यातली जनता कोणाच्या बाजूने आहे यावर जयघोष सुरू होईल. बऱ्याच विलंबाने या निवडणुका होत आहेत. मागे ८० च्या दशकात स्थानिक स्वराज्य संस्थांवर विशेष करून जिल्हा परिषदांवर प्रदीर्घ काळ प्रशासक होते. ही कोंडी सुधाकरराव नाईक यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात फुटली. निवडणुका पार पडल्या आणि नाईक यांनी जिल्हा परिषद अध्यक्षाला उपमंत्रीपदाचा दर्जा दिला. त्यांना लाल दिव्याची गाडी आली. या पदाचे महत्त्वही वाढले. महाराष्ट्रात ग्रामीण भागातली स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना बळकट करण्याचे खरे श्रेय दिवंगत यशवंतराव चव्हाण यांना जाते. त्यांच्यामुळे फेटा-मुंडासेवाले जिल्हा परिषद, पंचायत समितीत सत्तेत मानाच्या पदावर आले, असे म्हटले जाते. आताच्या निवडणुका ओबीसींना राजकीय आरक्षण असावे की नाही याचा वाद सुरू असतानाच पार पडत आहेत. या आरक्षणात कोणाला घालवायचेय आणि कोणाला ठेवायचेय यावर राज्यातल्या प्रमुख पक्षांनी कडाकडा भांडणे केली. वाद सर्वोच्च न्यायालयात गेला. कोण सत्तेत असताना न्यायालयीन प्रकरणात किती वेळा कोणी पुढच्या तारखा मागत सुनावणी का लांबवली असावी, याचा तपशील समजून घेतला तर अनेकांच्या ज्ञानात उत्तम भर पडेल. स्थानिक स्वराज्य संस्थांचे काय व्हायचे ते होईल, पण आपल्याला हवी ती वेळ सध्या नाही, असा विचार यामागे झाला असे म्हणतात. याचा आणखी एक चिंताजनक परिणाम केंद्राकडून मिळणाऱ्या निधीवरही झाल्याची चर्चा उच्चस्तरीय वतुर्ळात असते. स्थानिक स्वराज्य संस्थांत लोकनियुक्त सत्ता नाही असे कारण सांगत देय असलेला किती निधी मिळालेला नाही, याचा परिणाम काय झाला, हा अभ्यास करायला विरोधकांनाही बहुदा वेळ मिळालेला नाही. त्यामुळे इतरांनी तरी तो का करावा, अशी स्थिती आहे. एरवी निवडून आलेले लोक सांगतील त्याप्रमाणे स्थानिक प्रशासन वागते. आमचे हात बांधले गेले आहेत. तुमच्या निर्वाचित सदस्यांना किंवा सत्तेत असलेल्यांना तुमचे काम सांगा, अशी उत्तरे नागरिकांना सर्रास मिळतात. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासकराज असताना राजकीय दबावमुक्त कारभार झाला का आणि लोकांनाही त्याचा वेगळा परिणाम जाणवला का, या प्रश्नांचे उत्तर काय आहे? फरकच जाणवला नसेल तर निवडणूक झाली काय अन न झाली काय, आम्हाला अभिप्रेत असलेल्या आवश्यक त्या सोयी-सुविधा अशाही अन तशाही मिळत नसतील तर काय फरक पडतो, असे सामान्य नागरिकांना वाटत असेल तर त्यात गैर काय? प्रगत देशात स्थानिक स्वराज्य संस्थांना फार महत्त्व आहे. तिथे शहरांमध्ये महापौर हे अतिशय महत्त्वाचे पद आहे. केवळ स्थानिक प्रशासनच नव्हे, तर कायदा व सुव्यवस्था राखण्यात त्यांचा मोठा सहभाग असतो. शहर आणि नागरिकांच्या हितासाठी मोठे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना दिले जाते. राज्य किंवा देशपातळीवरून फक्त धोरणे आखली जातात. या स्वातंत्र्याचे वेगळ्या संदभार्ने सर्वात मोठे उदाहरण न्यूयॉर्कच्या जागतिक व्यापार केंद्रावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतरच्या परिस्थितीतून दिसते. त्यावेळच्या महापौरांशिवाय लोकांनी कोणत्याही राजकीय नेत्यांना घटनास्थळी पाहिलेले नाही. मदतकार्यात निर्णय घेण्याचे, आदेश देण्याचे सर्वाधिकार महापौरांना होते. या हल्ल्याची स्मृती जागृत रहावी म्हणून घटनास्थळी तयार केलेले स्मारक आणि संग्रहालय पाहिले तर तिथे कोणत्याही राजकीय व्यक्तीचे साधे छायाचित्रसुद्धा नाही. बड्या नेत्यांपैकी कोणी भेट दिली का, हेही तिथे दिसून येत नाही. संपूर्ण झोत मदतकार्यावर आहे. आपल्याकडे काय चित्र असते, यावर न बोललेलेच बरे. आपल्याकडे अमुक एका गावावर किंवा शहरावर राजकीय नियंत्रण कोणाचे व शब्द कोणाचा अंतिम यावर आधारित कारभार करण्याचा रिवाज पडला. सरकारी यंत्रणासुद्धा त्या दिशेनेच जाताना दिसतात. नागरिक फक्त मतदानापुरता आणि कर भरण्यापुरता असतो, असा समज तयार झाला आहे. स्वतःचे हक्क आणि अधिकार, मिळणाऱ्या सोयीसुविधांचा दर्जा अशा मुलभूत मुद्द्यांवर कोणी विचारात पडू नये म्हणून नागरिकांना भलत्याच विषयांची धुरी दिली जाते. आजूबाजूचा कचरा वेळेवर उचलला जात नाही म्हणून दुर्गंधी येत असली, रस्ता वेळेवर न झाडला गेल्याने धूळ उडून नाका-तोंडात जात असली तरी अमूक नेता, पक्ष तुम्ही मानत असलेला नेता व पक्ष यापेक्षा कसे श्रेष्ठ आहेत, यावर लोक वाद घालत असतात. ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था स्वायत्त व्हाव्यात, त्यांना कारभाराचे स्वातंत्र्य असावे, विकासासाठी निधी थेट मिळावा, त्यांनी फारसे कोणावर अवलंबून राहू नये, अशी अपेक्षा होती. ती तशीच राहिली. स्थानिक स्वराज्य संस्था राज्य आणि केंद्रावर अवलंबून राहाव्यात ज्या योगे आपल्याला स्थानिक पातळीवर राजकीय संघटन मजबूत ठेवता येईल आणि त्याचा फायदा विधानसभा व लोकसभा निवडणुकीसाठी होईल, अशाच पद्धतीने काम होत गेले. परिणाम असा झाला की सत्ताधारी पक्षाच्या बाजूने राहिलो नाही तर आपली कोंडी होईल आणि निधीच मिळणार नाही, या दडपणात स्थानिक राजकारण होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रशासकीय प्रमुखांच्या बदल्यांचे अधिकार राज्य सरकारला असल्याने व त्यावर सत्ताधारी पक्षाचे अधिकार चालत असल्याने मोठा फरक पडतो. परिणामी निवडून येताना पक्ष, आघाडी कुठलीही असो, निवडणूक झाली की ती तशीच राहील याचीही खात्री नसते. नगरपालिकांमध्ये नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडून देणारी व्यवस्था सध्या आहे. काही ठिकाणी नगरराध्यक्ष एका पक्षाचा आणि पालिकेत बहुमत अन्य पक्षाचे किंवा आघाडीचे असे चित्र अनेक ठिकाणी दिसते. अखेर राजकीय अस्थिरतेचा फायदा सरकार चालविणारे घेतात आणि चित्र बदलून जाते. केंद्राकडून शहरांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी येत असतो. त्यावर अनेकांचे बारीक लक्ष असते. पाणी पुरवठा, मलनिस्सारण, अग्निशमन यंत्रणा बळकटीकरण यासाठी गेल्या काही वर्षांत बराच निधी आला आहे. या यंत्रणा बळकट होतीलही, पण त्या चालविण्याची जबाबदारी असलेले लोक तितकेसे प्रशिक्षित आहेत का, त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध आहेत का, याचा विचार मात्र होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरोग्य सेवेबाबत नेहमी तक्रारी असतात. ग्रामीण आणि निमशहरी भागात शालेय शिक्षणाची जबाबदारीसुद्धा या संस्थांवर आहे. निवडणुका येतील, जातील. नागरी जीवनात नेमका काय फरक पडणार, हा खरा प्रश्न!

# रात्रीस खेळ चाले!

यंदा मराठवाड्यावर अस्मानी संकट कोसळलं. ज्या भागात पावसाची आणि पाण्याची वानवा असते त्या भागात नको तेवढा पाऊस कोसळला. इतका की मराठवाडा महापुरात बुडाला, शेतातील तयार पिके झोपली, घरे कोसळली, अनेकांचा मृत्यू झाला, लोकांचे संसार वाहून गेले. या महापुरात मराठवाड्यातील अतिवृष्टी झालेल्या भागातील लोकांकडे अंगावरील वस्त्राखेरीज काहीही नव्हते. शेतकऱ्यांची व्यथा त्याहून वेगळी होती. पीक जमीनदोस्त झालेच शिवाय ज्या जमिनीत पीक घेतलं जाते ती जमीनही खरवडून निघाली होती. खरीप पीक गेलंच आता रब्बीच्या हंगामात काय करायचं, असा प्रश्न मराठवाड्यासह सोलापूर, बुलढाणा, वर्धा जिल्ह्यातील शेतकरी विचारत आहेत.

नुकसानभरपाई देण्यास सरकारने सुरू केले आहे मात्र, ती पुरेशी नाही. गंभीर बाब म्हणजे पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील शिल्लोत्तरमधील मधुकर बाबुराव पाटील या शेतकऱ्याला भात पिकाच्या मोठ्या नुकसानीनंतर सरकारकडून २ रुपये ३० पैशांची नुकसानभरपाई देण्यात आली. यामुळे पालघर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. अशातच शेतकऱ्यांचा संताप आणखी वाढवणारी दुसरी घटना सोलापूरच्या मोहोळ तालुक्यातील कोळेगावात घडली. केंद्रीय पथकाने रात्री भेट देऊन बॅटरीच्या प्रकाशात नुकसानीची पाहणी केली. त्यामुळे शेतकऱ्यांची चीड अनावर झाली आहे. केंद्रीय पथकाला नुकसान झालेल्या शेतीची पाहणी करण्यासाठी रात्रीचीच वेळ मिळते का, असा सवाल त्यांनी केला आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली आणि धाराशिव शिवाय सोलापूर बुलढाणा या जिल्ह्यांना पावसाने अक्षरशः ओरबडले. या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील मांजरा आणि सिना या नद्यांना महापूर आला हीच मराठवाड्यासाठी मोठी बातमी होती. आष्टीमध्ये रेस्क्युसाठी हेलिकॉप्टर उतरावे लागते, यातूनच केवढी अतिवृष्टी झाली, याचा अंदाज येतो. शेतीची तर वाताहत झाली. मातीचा एक इंच थर जमा व्हायला ४०० वर्षे लागतात इथे तर अनेक भागात २० फूट माती वाहून गेली. यातूनच कशा पद्धतीने आणि किती नुकसान दीर्घकाळासाठी झाले, याची जाणीव होते. सप्टेंबरमध्ये मराठवाड्यात चारवेळा महापूर झाला, चारवेळा घरांमध्ये पाणी शिरले, चारवेळा शेती खरवडून निघाली. शेतकरी तीन पिढ्या मागे गेला होता.

एवढे होऊनही शेतकऱ्यांचा टाहो सुरुवातीला सरकारच्या कानावर पोहोचला नव्हता. प्रशासनदेखील फारसे गंभीर नव्हते. ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी महापुरातून आजी आणि नात यांना वाचवल्यानंतर राज्य सरकारला पुराचे गांभीर्य कळले. त्यानंतर सर्व मंत्र्यांना अतिवृष्टी भागाचा दौरा करण्याचे मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले. मग सगळेच मंत्री, आमदार थेट शेतकऱ्यांच्या बांधावर गेले. काहींना शेतकऱ्यांच्या संतापाचा सामना करावा लागला तर काहींना नुकसानभरपाई कधी मिळणार, या शेतकऱ्यांच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत होते. अजूनही शेतकऱ्यांना जाहीर केलेली सर्व मदत मिळालेली नाही. राज्य सरकारने केंद्राला निवेदन दिले असले तरी त्यांच्याकडे अहवाल गेल्याशिवाय केंद्राकडून मदत मिळणार नाही. अशी पार्श्वभूमी असताना केंद्रीय पथक महापुरानंतर तब्बल महिनाभराने अवतरते आणि रात्री बॅटरी घेऊन पाहणी करत असेल तर शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळल्यास आश्चर्य वाटू नये. याला केंद्र सरकारचा रात्रीस खेळ चाले म्हणायचे की, हा सरकारचा शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ चाललेला आहे. याला खरे तर दिव्याखाली अंधार असे म्हणावे लागेल.

खरे तर केंद्र सरकारने पाहणी पथक महिन्यापूर्वी पाठवण्याची गरज होती. मात्र, उठता-बसता शेतर्कयांचं नाव घेणाऱ्या राज्य आणि केंद्र या दोन्ही सरकारांना त्याची गरज वाटली नाही. त्यातही आलेल्या पथकाने ४ नोव्हेंबरच्या रात्री बॅटरीच्या उजेडात सोलापूर जिल्ह्यातील कोळेगावातील पाहणी केली. हा दौरा रात्रीऐवजी दिवसा करता आला नसता का? सूर्यप्रकाशात शेतकऱ्यांचे नुकसान आणि अश्रू पाहण्यापेक्षा रात्री काहीही न पाहणे, हेच केंद्रीय पथकाने ठरवले होते का? पाहणी पथकाला दिवसा दौरा करण्यात काही अडचण होती का? याची उत्तरे मिळालीच पाहिजेत. असा दौरा म्हणजे एकप्रकारे शेतकऱ्याची क्रूर चेष्टा म्हणायला हवी!

केंद्रीय पथकासोबत आलेल्या कर्मचाऱ्यांनी बॅटरीचा उजेड लांब लांब मारत अधिकाऱ्यांना झालेले नुकसान दाखवण्याचा प्रयत्न केला. यातून त्यांनी किती नुकसान पाहिलं, हे केंद्रीय पथकालाच ठाऊक. मात्र, शेतकऱ्यांनी या प्रकाराबद्दल प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. मुळात कोळेगावातील दौरा आधीपासूनच ठरला होता. तरीही केंद्रीय पथक पुण्याहून उशिरा निघाल्याने गावात पोहोचायला रात्र झाली. त्यानंतर बॅटरीच्या उजेडात पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. त्यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. मात्र, जे सूर्यप्रकाशात लख्ख दिसलं असतं, ज्याचे गांभीर्य अधिक जाणवले असते ते गांभीर्य अंधारातील दौऱ्यात निघून गेले. बॅटरीच्या प्रकाशात केंद्रीय पथकाने नुकसानग्रस्त परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाददेखील साधला. मात्र, आधी महापुराचे गांभीर्य समजण्यात केलेला उशीर, त्यानंतर सरकारकडून नुकसानभरपाई जाहीर करण्यात झालेली दिरंगाई आणि महापुरानंतर महिना उलटून गेल्यानंतर आलेले केंद्रीय पथक. यामुळे बुंद से गयी वो हौद सें नही आती, असे सरकारचे होत आहे. एवढे होऊनही केंद्र सरकारकडून मदत केव्हा मिळणार, हा प्रश्न आहेच. सरकारने शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळू नये, त्यांना लवकरात लवकर भरपाई द्यावी हीच अपेक्षा.

# सांप्रदायिक सलोखा जपणे आवश्यक



या घटनेनंतरही स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात येत नसल्यामुळे या प्रकरणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. त्यामुळे, 'आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्यांविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून संबंधितांना न्याय मिळवून द्या व सदरचा कारवाई अहवाल सादर करा', असे आदेश राज्य अल्पसंख्यांक आयोगाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना १ नोव्हेंबर रोजी दिल्यावर अखेरीस चक्रे फिरली आणि २ नोव्हेंबरच्या रात्री आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम ३०७ खाली गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा आणि परिसरातील संवेदनशील नागरिकांना अस्वस्थ केले होते. मानवी संवेदना जपणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या मनात या घटनेबाबत दुःख, शोक, संताप आणि न्यायाच्या अपेक्षा आहेत. या घटनेचा सखोल आणि निष्पक्ष तपास व्हावा, दोषींवर कायद्यानुसार योग्य कारवाई व्हावी आणि भविष्यात कोणालाही अशाप्रकारचा सांप्रदायिक अन्याय व भेदभाव सहन करावा लागू नये, हीच सर्वांची अपेक्षा आहे. म्हणूनच सर्व धर्मीय समाजघटक, सामाजिक संघटना आणि सजग नागरिकांनी एकत्र येत सर्वधर्मीय शांतता अभियानाचे आवाहन केले आहे. नागरिकांनी वेळ पडल्यास ओरोस येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे मोर्चा काढण्याची तयारी सुरु केली होती. संविधान, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांवर उभ्या असलेल्या लोकशाही राष्ट्रातील 'आम्ही भारतीय' या संविधानिक मूल्यांवर काम करणाऱ्या नागरिकांनी आयोजित केलेला हा मोर्चा पूर्णपणे अहिंसात्मक, संविधानसंमत आणि शांततेचा संदेश देणारा असेल, अशी तयारी आयोजकांनी सुरू केली होती. कायदा आपले काम करेल. आम्ही न्यायावर आणि संविधानावर पूर्ण विश्वास ठेवतो! मोर्चा काढण्याची वेळ आमच्यावर आणू नका, असे आयोजकांचे म्हणणे अखेरीस पोलिसांनी मान्य केले असले तरी न्यायासाठी अजूनही प्रयत्न सुरूच ठेवावे लागतील, याची जाणीव कार्यकर्त्यांना आहे.

प्रत्येक धर्माच्या समाजघटकास आणि नागरिकाला येथे समान न्याय आणि सन्मानाने वागण्याचा अधिकार आहे. या मूल्यांवर काम करणारा 'आम्ही भारतीय' हा मंच सावंतवाडी, सिंधुदुर्ग भागात गेले कित्येक वर्ष सलोख्याचे काम करत आहे. देशात व राज्यातही सर्वत्र द्वेषाचे वातावरण पसरत असताना विशेषतः कोकणात सामाजिक सलोखा टिकून राहिला आहे, असे वाटत होते. असे असताना बांद्यातील ही व अशा इतर घटना अस्वस्थ करणाऱ्या आहेत. महाराष्ट्राच्या सीमेवरील व गोव्याच्या बाजूलाच असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात खरे तर हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन सहजीवन सहज पाहायला मिळते. मात्र 'ते' आणि 'आपण' अशी दुही समजात माजवू पाहणाऱ्यांकडून धार्मिक धृवीकरणाचे जे संविधानविरोधी प्रयत्न सुरू आहेत; त्यामुळे हे सहजीवन उद्ध्वस्त होण्याचा धोका वाढतो आहे.

महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी सध्या सामाजिक सलोखा मोडीत काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. समाजात तणाव आणि वैमनस्य निर्माण व्हावे या हेतूने, धार्मिक आणि जातीय विद्वेष झपाट्याने पसरवण्याचे काम सुरू आहे. अशा वेळी 'अमन के हम रखवाले, हम एक है', या भावनेने समाजात मिसळत संवाद वाढवण्याची गरज आहे. विकासाच्या मुद्याऐवजी धार्मिक द्वेषाचे वातावरण निर्माण करणाऱ्यांवर सरकार आणि प्रशासनाने योग्य ती कायदेशीर कारवाई करून, या देशातील संविधानिक हक्कांचे व मूल्यांचे तसेच सामाजिक शांतता आणि सलोखा यांचे रक्षण करण्याची मागणी करणारे नागरिक एकत्र येत आहेत, ही जमेची बाजू आहे.

समाजात शांतता आणि सौहार्द राखण्यासाठी कटिबद्ध असलेल्या जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय(एनएपीएम)ने समाजातील सौहार्द, शांतता, बहुविधता, एकात्मता व धर्मनिरपेक्षता केवळ टिकून राहण्यासाठीच नाही, तर वृद्धिंगत व्हावी, यासाठी 'सद्भाव मंच' स्थापन केला असून, देशात अनेक ठिकाणी तो कार्यरत आहे. सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षतेची ताकद उभी व्हावी, यासाठी सद्भाव मंचातर्फे अनेक प्रयत्न केले जात आहेत. दंगली, झुंडबळी, धार्मिक व जातीय दडपशाहीच्या घटना घडू नये यासाठी समाजात सौहार्दवृद्धीचे अनेक उपक्रम राबविले जात आहेत. विसंवाद वाढवणारे हिंसक प्रकार घडल्यास अशा ठिकाणी तातडीने धावून जाण्याचे कामही सुरू आहे. सद्भाव अडचणीत असताना अशा हस्तक्षेपाच्या कामाबरोबरच सत्यशोधनाचे काम आवश्यक आहे. कारण त्यामुळे या मुद्द्यावर धोरण ठरवताना त्याचा उपयोग होऊ शकतो, हे लक्षात घेऊन सद्भाव मंच अशा कामात सक्रीय आहे. घटनांची माहिती घेण्यासाठी सत्यशोधन समिती स्थापन करणे, घटनेचा निःपक्षपाती अहवाल तयार करणे, सामाजिक सलोखा व निर्भयतेने जगण्याच्या अधिकाराची मागणी व अंमलबजावणीचा आग्रह शासन-प्रशासनाबरोबर होणाऱ्या मुद्याधारित चर्चेत धरणे, ह्या दृष्टीनेही सद्भाव मंच काम करत आहे.

पुण्यातील फरीद शेख आणि त्यांचा मुलगा फैजान शेख यांच्यावर २ ऑक्टोबरला झालेल्या हल्ला प्रकरणात, आरोपींना अद्याप अटक झालेली नाही. पोलिसांवर दबाव येत असेल तर राज्यकर्त्यांनी यात लक्ष घालून, असे होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. लोकशाहीत मतभेद असणार. विविध घटकात चालीरीतींमध्ये वैविध्य राहणार. अशावेळी, 'सांप्रदायिक विविधता, त्यात अनोखी एकता', हे भारताचे वैभव टिकवण्यासाठी, सांप्रदायिक सलोखा जपणे आवश्यक आहे!

लाचे दुकान लावण्यास वारंवार अटकाव केल्याने नैराश्य आल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तरुणाने २९ ऑक्टोबर रोजी आपल्या घरातच पहाटे गळफास लावून आत्महत्या केली. सावंतवाडी तालुक्यातील बांदा मुस्लीम वाडीतील आफताब कमरुद्दीन शेख या ३८ वर्षीय तरुणाने आत्महत्येपूर्वी व्हिडिओ करून आपल्या आत्महत्येला बांदा शहरातील पाचजण जबाबदार असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी बांदा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आफताबचे बांदा बाजारपेठेत फुलांचे दुकान आहे. आठ महिन्यांपूर्वी दुकान लावताना, शहरातील काही तरुणांनी त्याला दुकान लावण्यास अटकाव केला. त्यानंतर तब्बल आठ महिने त्याला व्यवसाय करु दिला नाही. दरम्यान, आता जत्रेचा सीझन चालू झाल्यामुळे त्याने पुन्हा आपले दुकान सुरू केले. मात्र त्यातल्याच काही लोकांनी, आफताबला पुन्हा व्यवसाय करू देणार नाही अशी भूमिका घेतली. ''आपण व्यवसाय करू शकत नसल्यामुळे घरची परिस्थिती हलाखीची झाली आहे. आपल्या बायकामुलांचे हाल होत आहेत. त्यामुळे आता माझ्यासमोर कोणताही पर्याय नाही, म्हणून मी आत्महत्या करत आहे. माज्या मुलांना सांभाळा'', अशी भावनिक व आर्त हाक आफताबने व्हिडिओमार्फत घातली आणि आत्महत्या केली. त्यात त्याचे निधन झाले.

आफताबने व्हिडिओत उल्लेख केल्याप्रमाणे त्याच्या आत्महत्येला बांदा येथील पाचजण जबाबदार आहेत. त्यांना पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा व त्यांना अटक करावी. जोपर्यंत त्यांना अटक केली जात नाही तोपर्यंत पोस्टमार्टेमसाठी नेलेला मृतदेह आम्ही ताब्यात घेणार नाही, असा इशारा आफताबच्या नातेवाईकांनी पोलिसांना दिला. त्यांच्या म्हणण्यानुसार, सावंतवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास आधी नकार दिला.

पोलिसांवर बहुधा दवाब असावा. वारंवार विनवणी करून सुद्धा पोलीस दखल घेत नाहीत. त्यामुळे काही झाले तरी आम्ही माघार घेणार नाही, अशी रास्त भूमिका आफताबच्या नातेवाइकांनी त्यानंतर घेतली. पत्रकारांशी संवाद साधताना त्याचे भाऊ अब्दुल रजा म्हणाले, ''नैराश्यातून आफताबने आत्महत्या केली आहे. वारंवार संबंधित चार-पाच जणांकडून त्याच्यावर दबाव येत होता, त्यामुळे आफताबने हा प्रकार केला. त्यामुळे काही झाले तरी माझ्या भावाच्या आत्महत्येला कारणीभूत ठरणाऱ्या संबंधितांवर कारवाई केल्याशिवाय माघार घेता येणार नाही.''

या घटनेनंतरही स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात येत नसल्यामुळे या प्रकरणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. त्यामुळे, 'आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्यांविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून संबंधितांना न्याय मिळवून द्या व सदरचा कारवाई अहवाल सादर करा', असे आदेश राज्य अल्पसंख्यांक आयोगाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना १ नोव्हेंबर रोजी दिल्यावर अखेरीस चक्रे फिरली आणि २ नोव्हेंबरच्या रात्री आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम ३०७ खाली गुन्हा दाखल झाला आहे.


या घटनेने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा आणि परिसरातील संवेदनशील नागरिकांना अस्वस्थ केले होते. मानवी संवेदना जपणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या मनात या घटनेबाबत दुःख, शोक, संताप आणि न्यायाच्या अपेक्षा आहेत. या घटनेचा सखोल आणि निष्पक्ष तपास व्हावा, दोषींवर कायद्यानुसार योग्य कारवाई व्हावी आणि भविष्यात कोणालाही अशाप्रकारचा सांप्रदायिक अन्याय व भेदभाव सहन करावा लागू नये, हीच सर्वांची अपेक्षा आहे. म्हणूनच सर्व धर्मीय समाजघटक, सामाजिक संघटना आणि सजग नागरिकांनी एकत्र येत सर्वधर्मीय शांतता अभियानाचे आवाहन केले आहे. नागरिकांनी वेळ पडल्यास ओरोस येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे मोर्चा काढण्याची तयारी सुरु केली होती.

संविधान, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांवर उभ्या असलेल्या लोकशाही राष्ट्रातील 'आम्ही भारतीय' या संविधानिक मूल्यांवर काम करणाऱ्या नागरिकांनी आयोजित केलेला हा मोर्चा पूर्णपणे अहिंसात्मक, संविधानसंमत आणि शांततेचा संदेश देणारा असेल, अशी तयारी आयोजकांनी सुरू केली होती. कायदा आपले काम करेल. आम्ही न्यायावर आणि संविधानावर पूर्ण विश्वास ठेवतो! मोर्चा काढण्याची वेळ आमच्यावर आणू नका, असे आयोजकांचे म्हणणे अखेरीस पोलिसांनी मान्य केले असले तरी न्यायासाठी अजूनही प्रयत्न सुरूच ठेवावे लागतील, याची जाणीव कार्यकर्त्यांना आहे.

प्रत्येक धर्माच्या समाजघटकास आणि नागरिकाला येथे समान न्याय आणि सन्मानाने वागण्याचा अधिकार आहे. या मूल्यांवर काम करणारा 'आम्ही भारतीय' हा मंच सावंतवाडी, सिंधुदुर्ग भागात गेले कित्येक वर्ष सलोख्याचे काम करत आहे. देशात व राज्यातही सर्वत्र द्वेषाचे वातावरण पसरत असताना विशेषतः कोकणात सामाजिक सलोखा टिकून राहिला आहे, असे वाटत होते. असे असताना बांद्यातील ही व अशा इतर घटना अस्वस्थ करणाऱ्या आहेत. महाराष्ट्राच्या सीमेवरील व गोव्याच्या बाजूलाच असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात खरे तर हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन सहजीवन सहज पाहायला मिळते. मात्र 'ते' आणि 'आपण' अशी दुही समजात माजवू पाहणाऱ्यांकडून धार्मिक धृवीकरणाचे जे संविधानविरोधी प्रयत्न सुरू आहेत; त्यामुळे हे सहजीवन उद्ध्वस्त होण्याचा धोका वाढतो आहे.

....बाकी पुढील अंकात


# चुकांचा चक्रव्यूह



आश्रमात रात्री आलेला पाहुणा गुरुदेव ंच्या दर्शनासाठी उत्सुक होता. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच उठून तो प्रार्थना मंदिरात जाऊन गुरुदेवांची वाट पाहात बसला. गुरुदेव आले. आसनस्थ झाले. गुरुदेवांनी पाहुण्याकडे पाहून मंद स्मित केलं. गुरुदेवांना वंदन करून पाहुणा बोलू लागला, 'मी अत्यंत अस्वस्थ आहे. हल्ली माझी अस्वस्थता, बेचैनी आणि मानसिक तगमग वाढतेच आहे. हे चुकीचे आहे, हे मला समजतं. यातून बाहेर पडण्याचा जितका प्रयत्न करतो तितकी अस्वस्थता वाढते.' एवढं सगळं एका दमात बोलल्यावर पाहुणा क्षणभर थांबला. खाली मान घालून गुरुदेवांच्या चरणांकडे पाहत तो पुढे म्हणाला, ह्यमी आयुष्यात खूप मोठ्या चुका केल्या. काही चुकांमुळे मला चांगलेच फटके बसले. पण कालांतराने मी त्यातून बाहेर पडलो. सावरलो. पण आज त्या चुका आठवून खूप त्रास होतो. आपण तेव्हा असे नकारात्मक का वागलो, याचं कोडंच सुटत नाही. गतकाळातील चुकांचा पाढा सतत डोक्यात वाजत राहिल्याने मी माझा आत्मविश्वास गमावतो की काय, असं मला वाटू लागलं आहे. गुरुदेव, मला या चुकांच्या चक्रव्युहातून, नकारात्मक वागण्याच्या वेढ्यातून सुटायचं आहे. 'गुरुदेवांनी विचारलं, 'चूक म्हणजे काय? नकारात्मक वागणं म्हणजे काय?' पाहुणा म्हणाला, 'आता माज्या किती चुका सांगू? आणि काय-काय सांगू?' मंद स्मित करत गुरुदेव म्हणाले, 'फक्त सकारात्मक वागणं किंवा फक्त नकारात्मक वागणं असं काही नसतं. हे सापेक्ष असतं. एखादी घटना किंवा त्यावेळचं तुमचं वागणं याकडे तुम्ही कसं पाहता, यावर ते सकारात्मक की नकारात्मक, हे ठरतं. माझ्यासाठी जे सकारात्मक आहे तेच दुसऱ्यासाठी नकारात्मक असू शकतं. यातला फरक ओळखण्याचा सोपा मार्ग म्हणजे मनाची तटस्थता.' 'गुरुदेव मला थोडंफार समजतंय. पण त्या चुकांच्या चक्रव्युहातून बाहेर पडण्यासाठी मी काय करू, हे मात्र मला सोप्या भाषेत सांगा. गुरुदेव म्हणाले, 'चूक म्हणजे वेगळा विचार. आपण वेगळा विचार करून शिकतो. म्हणून चूक लक्षात ठेवायची नाही तर..' 'तर काय गुरुदेव?' गुरुदेव म्हणाले, 'त्या चुकीतून आपण काय शिकलो हेच लक्षात ठेवायचं, म्हणजे ती चूक पुन्हा होत नाही. एक चूक एकदाच कर पण रोज नवीन चुका...' गुरुदेवांनी पाहिलं, अस्वस्थ पाहुणा स्वस्थ झाला होता!

# आजारांपासून दूर राहा

## रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे ७ घरगुती उपाय



राज्यात कोरोना व्हायरसच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कोरोना रुग्णांची संख्या ३२ वर पोहोचली असून पुण्यात सर्वाधिक १५ कोरोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, कोरोनासह इतर संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी रोगप्रतिकारक शक्ती वाढवणं गरजेचं आहे. आपल्या शरीरातील इम्यून सिस्टममुळे आपला वेगवेगळ्या आजारापासून बचाव होतो. जर रोगप्रतिकारक शक्ती कमजोर झाली तर आजारी पडण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे आपल्या शरीरात रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असणं गरजेचं आहे. रोगप्रतिकारक शक्ती कमजोर होण्यामागे अनेक कारण आहेत. कित्येकदा आपल्या खाण्या-पिण्याच्या हलगर्णीपणामुळेही आपली रोगप्रतिकारक शक्ती कमजोर होते. तर दारु, सिगारेट यासारख्या चुकीच्या सवयीमुळे रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम जाणवतो. काही घरगुती उपायांनीही तुम्ही रोगप्रतिकारक शक्ती वाढवू शकता.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे काही उपाय**

१. ग्रीन टी किंवा ब्लॅक टी या दोन्ही गोष्टींमध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी फार फायदेशीर आहे. पण दिवसभरात एकदा किंवा दोनदा ग्रीन किंवा ब्लॅक टी प्या. जर तुम्ही अतिप्रमाणात याचे सेवन केलात तर ते शरीरासाठी हानिकारक असते.

२. कच्चा लसून खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. लसूनमध्ये भरपूर प्रमाणात एलिसिन, झिंक, सल्फर, सेलेनियन आणि व्हिटॅमिन ए आणि ई सुद्धा असतात.

३. नियमित दह्याचं सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत राहते. त्यामुळे पचनक्रियाही सुरळीत राहण्यास मदत होते.

४. ओट्समध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असतात. त्यासोबत त्यात अँटी-माईक्राबियल गुणही असते. दररोज ओट्सचे सेवन केल्याने इम्यून सिस्टम उत्तम राहते.

५. विटामिन डी हे आपल्या शरीरासाठी फार महत्त्वाचे असते. त्यामुळे आपल्याला अनेक रोगांचा सामना करण्याची ताकद मिळते. त्यासोबतच आपली हाडेही मजबूत होतात. तसेच हृदयासंबंधीत अनेक आजारापासूनही तुम्ही मुक्त होऊ शकता.

६. संसर्गजन्य रोगांपासून दूर राहण्यासाठी व्हिटॅमिन सी फार महत्त्वाचे असते. लिंबू, आवळा, संत्री यात मोठ्या प्रमाणात व्हिटॅमिन सी असते. त्यामुळे नियमित व्हिटॅमिन सी असलेली फळं खावीत.


७. तसेच हिरव्या पालेभाज्या, फळे, दूध याचाही आहारात नियमित समावेश ठेवावा. त्यामुळे तुमच्या शरीराला पोषक तत्त्व मिळतील आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यात मदत होईल.

# बाळंतपणानंतर कशी घ्यावी त्वचेची काळजी

गरोदरपण आणि बाळंतपण हा प्रत्येक महिलेच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात महिलांच्या शरीरात अनेक बदल होतात. हॉर्मोन्समध्ये होणाऱ्या बदलांचा परिणाम मानसिक स्थिती आणि त्वचेवर होत असतो. बाळंतपणानंतर स्त्रीचे शरीर पूर्ववत होण्यास सुरूवात होते. ज्यामुळे त्वचेवर प्रसूतीनंतरच्या काही खुणा दिसू लागतात. अपुऱ्या झोपेमुळे बऱ्याचदा डोळ्याखाली डार्क सर्कल्स निर्माण होतात. तर प्रसूतीनंतर शरीरावर स्ट्रेचमार्क्स होणं ही एक नैसर्गिक गोष्ट आहे. जर तुमचे सी-सेक्शन झाले असेल तर व्यायामाच्या अभावामुळे पूर्ववत होण्यास इतर महिलांपेक्षा जास्त काळ जाऊ शकतो. बाळाच्या जन्मानंतर काही दिवस तुम्ही घरी आराम करता मात्र नंतर पुन्हा ऑफिस आणि इतर कामांसाठी घराबाहेर पडणं गरजेचं असतं. म्हणूनच बाळंतपणानंतर त्वचेची कशी काळजी घ्यायची हे प्रत्येकाला माहीत असायलाच हवं.

**डिलिव्हरीनंतर अशी घ्या त्वचेची काळजी**

- बाळंतपणानंतर त्वचेची काळजी घेण्यासाठी फॉलो करा हे स्कीन केअर रूटीन
- दिवसभरात कमीत कमी दोनदा तुमचा चेहरा एखाद्या सौम्य क्लिंझरने स्वच्छ करा. यासाठी तुम्ही घरातील कच्चे दूध, गाजराचा रस, काकडीचा रस, पपईचा गर अशा नैसर्गिक गोष्टींचा वापर करू शकता.
- चेहऱ्यासाठी वॉटरबेस मॉश्चरायझरचा वापर करा. ज्यामुळे तुमची त्वचा हायड्रेट राहण्यास मदत होईल.



4दररोज पुरेसे पाणी प्या. कारण यामुळे तुमच्या शरीरातील टॉक्सिन्स बाहेर टाकले जातील आणि हॉर्मोन्स संतुलित होण्यास मदत होईल.

- डोळ्यांसाठी एखादी चांगली आयक्रीम वापरा. ज्यामुळे तुमच्या डोळ्याखालील रक्तप्रवाह सुधारण्यास मदत होईल.
- आठवड्यातून एकदा नैसर्गिक स्क्रबरने चेहरा स्वच्छ करा. घरातच साखर, मध, ऑलिव्ह ऑईल, कॉफी पावडरने तुम्ही नैसर्गिक स्क्रब तयार करू शकता.
- आठवड्यातून एकदा चेहऱ्यावर पपईचा गर अथवा संत्र्यांच्या सालींचा फेसपॅक लावा. ज्यामुळे त्वचेचे उत्तम पोषण होईल.
- भरपूर हिरव्या भाज्या, सलाड. ताजी फळे खा. ज्यामुळे त्वचेला पुरेसे पोषण मिळेल आणि त्वचा नितळ होईल.
- स्ट्रेचमार्क्स दूर करण्यासाठी नैसर्गिक स्क्रबरचा वापर करा. अंघोळ करताना आठवड्यातून कमीत कमी दोन ते तीन वेळा या स्क्रबरचा वापर करा. ज्यामुळे स्ट्रेचमार्क्स कमी होण्यास मदत होईल.
- घराबाहेर पडण्यापूर्वी चांगल्या गुणवत्तेचं सनस्क्रीन वापरण्यास मुळीच विसरू नका.
- बाळाचे बाबा, आजी, आजोबा, मदतनीस अशा घरातील इतर मंडळींची मदत घ्या आणि तुमच्या झोपेचं व्यवस्थित नियोजन करा. जेव्हा तुमचं बाळ झोपलेलं असेल तेव्हा तुम्हीदेखील झोपणं फार गरजेचं आहे हे लक्षात ठेवा.

**स्ट्रेच मार्क्स कमी करण्यासाठी अशी घ्या काळजी**

- बाळंतपणानंतर महिलांच्या पोट, कंबर, स्तन आणि मांड्यावर स्ट्रेच मार्क्स दिसू लागतात. या स्ट्रेच मार्क्समुळे प्रेगन्सीनंतर महिला त्यांना हवे तसे फॅशनेबल कपडे घालणं कमी करतात. शिवाय स्टेच मार्क्स लपविण्यापेक्षा काही घरगुती उपाय करून तुम्ही या स्ट्रेच मार्क्सपासून कायमची सुटका करून घेता येऊ शकते.
- पोट, मांड्या अशा स्ट्रेचमार्क्स असलेल्या भागावर नियमित ऑलिव्ह ऑईल, नारळाचे तेल याने मसाज करा.
- त्वचा मऊ आणि मुलायम होण्यासाठी आणि स्ट्रेचमार्क्स कमी करण्यासाठी तुम्ही कोरफडाच्या गराचादेखील वापर करू शकता. यासाठी कोरफडाचा गर नियमित स्ट्रेच मार्क्सवर लावा.
- स्ट्रेचमार्क्सवर अंड्याचा पांढरा भाग लावल्यामुळेदेखील चांगला फायदा होऊ शकतो.
- कच्च्या बटाट्याचा रस अथवा काकडीचा रस त्वचेवरील कोणतेही डाग कमी करण्यासाठी गुणकारी ठरते. यासाठी घरातील या गोष्टींचा वापर जरूर करा.
- कोकोबटर त्वचेसाठी अगदी उत्तम असते. कारण कोकोबटरमुळे तुमची त्वचा हायड्रेट आणि मॉश्चराईझ राहते. नियमित कोको बटर लावल्यास काहीच दिवसात तुम्हाला स्ट्रेच मार्क्स कमी झालेले दिसून येतील.

# घरातील या वास्तूदोषांमुळे होतात कुटुंबियांमध्ये वाद



घरही एक अशी जागा आहे, जिथे आलं की, कसं एकमद रिलॅक्स वाटतं. दिवसभरातला थकवा घरी आल्यावर नक्कीच कमी होतो. पण बरेचदा घरी असताना छोट्या छोट्या गोष्टींवरून कुटुंबियांमध्ये वाद होताना दिसतात किंवा घरातील कोणी ना कोणी व्यक्ती आजारी असते. तुम्ही कधी यामागील कारण शोधण्याचा प्रयत्न केला आहे का, की घरात सगळी सुबत्ता असतानाही घरात अशी परिस्थिती का. यामागील कारण असू शकतात घरातील वास्तूदोष. वास्तूशास्त्रानुसार सांगण्यात आलेले घरात आढळणारे काही वास्तूदोष जाणून घेऊया

- **मुख्य दरवाजा असावा मोठा :** स्तूशास्त्रानुसार घराचा मुख्य दरवाजा हा नेहमी घरातील इतर दरवाज्यांपेक्षा मोठा असायला हवा. जर तुमच्या घराचा मुख्य दरवाजा मोठा नसल्यास घरात नेहमी पैशांशी निगडीत समस्या जाणवत असल्याचं आढळतं. जसं वारंवार पैशांची चणचण जाणवणं, उत्पन्न नियमित असूनही घरावर सतत आर्थिक संकट येणं. साहजिकच याचा परिणाम घरातल्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होतो आणि वाद होतात.
- **बेडरूममध्ये नसावं वॉश बेसिन :** आजकाल बऱ्याच घरांमध्ये बेडरूम अटॅच्ड बाथरूम असतं आणि बाथरूममध्ये बेसिनही असल्याचं दिसतं. पण वास्तूशास्त्रानुसार घरातील कोणत्याही बेडरूमध्ये वॉश बेसिन नसावं.
- **पाण्याची गळती :** पाणी हा आपल्या जीवनातील अत्यावश्यक घटक आहे. पण बरेचदा आपण पाण्याबाबतही निष्काळजीपणा दाखवतो. उदा. बाथरूम किंवा वॉश बेसिनचा नळातून गळणारं पाणी. हो..घरातील कोणत्याही नळातून पाण्याची गळती होत असल्यास तोही वास्तूदोष मानला जातो. तुमच्याकडे असा एखादा गळणारा नळ असल्यास तो त्वरित दुरूस्त करून घ्या.
- **घराच्या आसपासच्या गोष्टी :** आपलं घर आपण नेहमीच स्वच्छ आणि टापटीप ठेवतो. पण तुम्हाला माहीत आहे का, घराच्या आसपास असणाऱ्या गोष्टींचाही आपल्या घरावर परिणाम होत असतो. तुमच्या घराच्या आसपास एखादं सुकलेलं झाड किंवा वीजेचा खांब असेल तर तो त्वरित दूर करण्यासाठी पाऊल उचला. कारण यामुळे घरात वास्तूदोष निर्माण होऊन घरामध्ये आर्थिक समस्या उद्भवू शकतात. खरंतर यामागील कारण हेही असू शकतं की, वीजेच्या खांबामुळे घरावर आपत्तीही ओढवू शकते किंवा घरातून दिसणाऱ्या सुकलेल्या झाडामुळे उदासही वाटू शकते. त्यामुळे घरासोबतच घराच्या आसपासचा परिसरही स्वच्छ आणि सुंदर ठेवा.
- **तुटक्या–फुटक्या वस्तू :** बरेचदा घरांमध्ये गरज नसलेल्या किंवा तुटलेल्या वस्तू आणि सामान विनाकारण ठेवलेलं असतं. पण तुम्हाला माहीत आहे का, यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा निर्माण होते. ज्यामुळे घरातील सदस्यांना मानसिक तणावाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे शक्य असेल तेवढं घरात कमीत कमी सामान ठेवा. जुनं तुटकं-फुटकं सामान किंवा गरज नसलेलं सामान लगेच घराबाहेर करा. तुम्हाला नक्कीच फरक जाणवेल.

# वजन घटवण्यासाठी करत आहात उपाय? ‘या’ ६ भाज्या-फळे कधीच खाऊ नका





निरोगी आरोग्यासाठी आहारात फळे आणि भाज्यांचे जास्त प्रमाणात सेवन करणं लाभदायक असते, असा सल्ला आपण जवळपास सर्वांकडूनच ऐकत असतो. पण सर्वच प्रकारच्या भाज्या आणि फळे अधिक प्रमाणात खाणं आरोग्यासाठी फायदेशीर ठरत नाही. विशेषतः जर तुम्ही वजन घटवण्यासाठी दिवस आणि रात्र एक करून कष्ट करत असताना आहारामध्ये कोणत्या भाज्या तसंच फळांचा समावेश करत आहात, याकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. काही भाज्या आणि फळांमध्ये कॅलरीज् जास्त प्रमाणात असतात. तसेच त्यांच्यातील ग्लायसेमिक इंडेक्स देखील जास्त असतं. अशा फळ-भाज्यांचं सेवन केलं तर वजन जलदगतीनं वाढू लागतं. फिगर स्लिम-ट्रिम व्हावी, यासाठी तुम्ही भरपूर कष्ट करत आहात तर आहारातून आजच या भाज्या आणि फळे कमी करा. जाणून घेऊन वजन कमी करताना कोणत्या भाज्या आणि फळे खाऊ नयेत.



**हिरव्या शेंगा :** हिरव्या शेगांमध्ये अधिक प्रमाणात प्रोटीन तसंच अन्य पोषकतत्त्वं असतात. एक कप फरसबीमध्ये ब्रोकलीपेक्षाही जास्त कॅलरीचा समावेश असतो. यामुळे वजन कमी करत असताना आपल्या आहारात हिरव्या शेंगांचं सेवन करू नये. फरसबीमुळे पचन प्रक्रियेवर दुष्परिणामही होतात. शिजवलेल्या फरसबीचं सेवन केल्यास लॅक्टिन नावाच्या प्रोटीनची पातळी कमी होते. फरसबीच्या सेवनामुळे काही जणांना त्वचेच्या समस्या होण्याचीही शक्यता असते. उदाहरणार्थ खाज सुटणे किंवा जळजळ होणे इत्यादी.

**फरसबीमधील घटक**

कॅलरी - ३१
प्रोटीन - १.८ ग्रॅम



**अॅव्होकाडो :** अॅव्होकाडो शरीरासाठी अत्यंत फायदेशीर असे फळ आहे. पण यामध्ये कॅलरीचं प्रमाणात जास्त आहे. एका मोठ्या अॅव्होकाडोमध्ये ३३२ ग्रॅम कॅलरी असतात. ज्यामुळे तुमचं वजन घटण्याऐवजी वाढण्यास सुरुवात होते. अॅव्होकाडोमध्ये फॅट्सही भरपूर प्रमाणात असतात. शिवाय, ज्यांची त्वचा अतिशय संवेदनशील आहे, त्यांनी शक्यतो अॅव्होकाडो खाऊ नये. कारण अॅलर्जी होण्याचा धोका आहे. अॅव्होकाडोमुळे यकृताच्या आरोग्यावरही दुष्परिणाम होतो. गरजेपेक्षा अधिक प्रमाणात हे फळ खाल्ल्यास पोटाच्याही समस्या उद्भवू शकतात.

**अॅव्होकाडोतील घटक**

कॅलरी - १६०
फॅट्स - १५ ग्रॅम
प्रोटीन - २ ग्रॅम



**सुका मेवा :** ताज्या फळांच्या तुलनेत सुका मेव्यामध्ये कॅलरींचं प्रमाण जास्त असते. कोशिंबीर, दही किंवा अन्य पदार्थांसह सुका मेव्याचं सेवन केल्यास पोटामध्ये अधिक प्रमाणात कॅलरीज जातात. यामुळे वजन घटण्याऐवजी तुमचं वजन जलद गतीनं वाढेल. वजन कमी करण्यासाठी सुका मेव्याचं सेवन कमी प्रमाणात करावं. बदामामध्ये अधिक प्रमाणात फायबर असल्यानं ते पचण्यास वेळ लागतो. बदामामुळे पचन प्रक्रियेवरही परिणाम होतो. यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या निर्माण होते. यामुळे शरीरात फॅट्स जमा होऊ लागतात. तर पिस्त्याचे सेवन करणे मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे.

**सुका मेव्यातील घटक**

कॅलरी - ३५९
फॅट्स - २.७ ग्रॅम



**मक्याचे दाणे :** मक्याच्या दाण्यांमध्ये स्टार्च आणि ग्लायसेमिक इंडेक्स भरपूर प्रमाणात असतं. यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते. मक्याच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजचा स्तर देखील कमी होऊ लागतो. ज्यामुळे आपल्याला सतत भूक लागते. वजन कमी करायचं असल्यास आहारातून मक्याचे दाणे वर्ज्य करा. मका हा फायबर आणि अन्य महत्त्वाच्या पोषकतत्त्वांचा चांगला स्त्रोत आहे. ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर फेकण्यास मदत होते. पण जास्त प्रमाणात मक्याचे सेवन केल्यास तुमच्या पोटाचं आरोग्य बिघडतं आणि पचन प्रक्रियेवर दुष्परिणाम होतात.

मक्याच्या **दाण्यातील घटक**


प्रोटीन - ३.२ ग्रॅम
कॅलरी- ८६



**बटाटा :** अशी कोणतीही पाककृती नाही, ज्यामध्ये बटाट्याचा समावेश केला जात नाही. वजन कमी करायचं असेल तर बटाट्याला ‘नो म्हणजे नो’ म्हणणं गरजेचं आहे. बटाट्यामध्ये स्टार्च आणि कार्बोहायड्रेसचं प्रमाण जास्त आहे. तुम्ही आहारामध्ये कोणत्याही स्वरुपात बटाट्याचा समावेश केला शरीरात फॅट्स जमा होऊन वजनही वाढतं. त्यामुळे बटाटा न खाणेच योग्य ठरेल. बटाट्याचं जास्त प्रमाणात सेवन केल्यास रक्तातील साखरेच्या पातळीवर परिणाम होतो, भूक जास्त लागते, टाइप २ मधुमेह यांसारख्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. बटर, पनीर किंवा क्रीमसह बटाट्याचं सेवन केलं तर तुमचं वजन नियंत्रणात राहणं अशक्य आहे.

**बटाट्यातील घटक**

कॅलरी - ७७
प्रोटीन - २ ग्रॅम



**द्राक्षे :** द्राक्षामध्ये निसर्गतः साखरेचं प्रमाण अतिशय आहे. शिवाय भरपूर प्रमाणात फॅट्सही आहेत. यामुळेच वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर डाएटमध्ये द्राक्षांचा समावेश करू नका. १०० ग्रॅम द्राक्षांमध्ये अंदाजे ६७ कॅलरी आणि १६ ग्रॅम साखरेचं प्रमाण असते. हे प्रमाण तुमच्या वजन वाढीसाठी पोषक आहे. द्राक्षांमुळे पचन प्रक्रियेवरही परिणाम होतो. जास्त प्रमाणात द्राक्षांचं सेवन केल्यास गॅसच्या समस्याही वाढतात.

**द्राक्षातील घटक**

कॅलरी - ६७
कार्बोहायड्रेट - १७ ग्रॅम

वजन घटवण्यासाठी तुम्ही विशिष्ट प्रकारचा डाएट फॉलो करत आहात किंवा व्यायामही करत आहात. तर वरील भाज्या आणि फळे आहारातून पूर्णतः कमी करा अथवा कमी प्रमाणात सेवन करा. तरच तुम्हाला परफेक्ट फिगर मिळण्यास मदत होईल.

# कुपोषणाप्रमाणेच अतिपोषणही तितकेच घातक





एकीकडे कुपोषणामुळे होणारा मृत्यू तर दुसरीकडे अतिपोषणामुळे तरुण वयातच आजारांचे वाढत चाललेले प्रमाण हे बदलते चित्र समोर येऊ लागले आहे. बदलत्या जीवनशैलीत खाण्यापिण्याच्या सवयीही बदलल्यामुळे कमी वयातच हृदयविकार, मधुमेह असे आजार वाढत सर्वच स्तरांमध्ये याबाबत चिंता व्यक्त करण्यात येत आहे. एकीकडे पुरेसा पोषक आहार न मिळाल्याने कुषोषणाचे शिकार ठरले आहेत तर दुसरीकडे जंक फुडचे वाढत्या सेवनामुळे हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, कोलेस्ट्रॉल,कॅन्सर यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे.

प्रत्येक घास चावून चावून सावकाश खा. भूक नसताना खाल्ल्यास तसेच अधिक प्रमाणात खाणे हे देखील आरोग्यासाठी घातक ठरते. यामुळे शरीरात अतिरिक्त चरबी साठल्यामुळे लठ्ठपणाचा शिकारी होऊ शकतो. म्हणून, हे पहा की जेव्हा तुम्हाला खरोखरच भूक लागली असेल तरच तुम्ही खा.

**अतिपोषणामुळे वाढतोय लठ्ठपणा :** अति प्रमाणात कॅलरीचे सेवन केल्याने लठ्ठपणाशी संबंधीत समस्या उद्भवतात. लठ्ठपणामुळे अनेक रोग होण्याची शक्यता वाढते जसे की हृदयरोग आणि धमन्यांचे आजार, मधुमेह असे विविध आजार जडतात. लठ्ठपणासारख्या आजारावावर मात करण्यासाठी जीवनशैलीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. एकीकडे त्यांना पुरेसा पोषक आहार मिळत नसताना, दुसरीकडे शहरी भागात फास्टफुडचे प्रमाण वाढल्याने तरुण वयातच जीवघेण्या आजारांचे प्रमाण वाढत आहे.

**संतुलित आहाराचे सेवन करा :** रेस्टॉरंट्समध्ये उच्च-कॅलरीयुक्त जेवण दिले जाते ज्यामुळे वजन वाढणे किंवा लठ्ठपणा होऊ शकतो. म्हणूनच अशा खाण्याच्या सवयींपासून दूर राहणे गरजेचे असून निरोगी जीवनशैली अमलात आणणे आवश्यक आहे. हिरव्या पालेभाज्या, कोशिंबीरी, सूप आणि ग्रील्ड फिश असे पदार्थ रेस्टॉरंटमध्ये खायला हरकत नाही. ज्यामध्ये कॅलरीचे प्रमाण कमी असते आणि फॅट्स देखील कमी असतात. बैठी जीवनशैली असणाऱ्यांनी देखील वेळात वेळ काढून शारीरीक हालचाली आणि व्यायामाकडे लक्ष द्यावे.

जंक फुड, फास्ट फुडचे सेवन करू नका. जर आपण आपल्या घरात अस्वास्थ्यकर अन्न साठवले तर आपण हे सर्व चुकीचे करीत आहात! जंक फुडने वजन वाढते त्यामुळे त्यापासून लांब राहणे आवश्यक आहे. आपल्या रोजच्या आहारात ताजी फळे तसेच पालेभाज्यांचा समावेश असावा. बेकरीचे पदार्थ, मैदायुक्त पदार्थ टाळणे योग्य आहे. बाहेर जे पदार्थ खातो त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मुलांना संतुलित आहार द्या. अन्नाचे गरजेपेक्षा जास्त सेवन करु नका. आपल्या दररोज किती आहार घ्यावा याबद्दल आहार तज्ज्ञांशी चर्चा करा. अति खाणे टाळण्यासाठी लहान प्लेट वापरा. आपण एखाद्या पार्टीत जात असल्यास आपण काय खावे हे आपण स्वतः ठरवावे आणि त्यामध्ये कमी कॅलरीयुक्त पदार्थांचा समावेश करावा. संतुलित आहाराची निवड करा ते आपल्याला लठ्ठपणा दूर ठेवण्यास मदत करेल.

आपल्या तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही क्रॅश डाएटचे अनुसरण करू नका. अतिरिक्त आहाराचा मारा न करता आपल्या आहारामध्ये पौष्टिक पदार्थांचा समावेश करा. संतुलित आहार आणि व्यायाम आपल्याला निरोगी आयुष्य जगण्यात नक्कीच फायदेशीर ठरते.

# मिरा-भाईंदरमधील मिठागराच्या जागा महापालिकेकडे लवकरच हस्तांतरित होणार

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



मिरा-भाईंदर शहरात मिठागर विभागाच्या अनेक जमिनी आहेत. या जमिनीवर महापालिकेची प्रस्तावित रस्ते व विविध आरक्षणे आहेत. महापालिकेने या जागा ताब्यात देण्याची मागणी केली होती. यासाठी मीठ विभागाने ३० ऑक्टोबर रोजी ऑनलाईन बैठक घेतली. या बैठकीत मीठ विभागाच्या जागा लवकरच महापालिकेला हस्तांतर करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. महापालिकेला या जागेसाठी मीठ विभागाला बाजार मूल्यापैकी केवळ १० टक्के आर्थिक मोबदला द्यावा लागणार असल्याचे सांगितले आहे. महापालिकेला या जागेसाठी २५ कोटी ९१ लाख १४ हजार ४७३ रुपये एवढे मूल्य मीठ विभागाला अदा द्यावे लागणार आहेत. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासुन मीठ विभागाच्या जागेत अडकलेले सार्वजनिक रहदारीचे रस्ते, मैदाने व इतर आवश्यक आरक्षित मैदाने विकसित होणार असल्याने विकासाची कामे मार्गी लागणार असल्याचे पालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा व शहर अभियंता दिपक खांबीत यांनी सांगितले आहे.

मिरा-भाईंदर महापालिकेच्या विकास आराखड्यात शहरातील विविध खासगी तसेच सरकारी जागांवर आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. यातील बहुतांश जागा या मीठ विभागाच्या आहेत. या जागा महापालिकेकडे हस्तांतरित झाल्या नसल्यामुळे विकास करण्यास अडचण निर्माण झाली होती. या मीठ विभागाच्या जागांमध्ये भाईंदर पश्चिमेच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर स्टेडियमचे आरक्षण टाकण्यात आलेले आहे. हि जागा १ लाख ८० हजार चौरस मीटर इतकी आहे. तसेच बोस मैदान ते मोर्वा गावादरम्यान ३० मीटर रुंद रस्ता प्रस्तावित असून त्याचे क्षेत्र २७ हजार १८० चौरस मीटर इतके आहे.

मिरारोड पूर्वेकडील ३२ हजार ७५८ चौरस मीटर जागेवर ३० मीटर रेल्वे समांतर रस्त्याचे आरक्षण आहे. मिरारोड पूर्व व पश्चिमेला जोडर्णाया रेल्वे उड्डाणपुलाचे आरक्षण प्रस्तावित आहे. भाईंदर पश्चिमेला रुंद रस्त्याचे व मलनिस्सारण केंद्राचे आरक्षण आहे. नियोजित मेट्रो कारशेडकडे जाण्यासाठी बोस मैदानामागून ४५ मीटर रुंद रस्त्याचे व डोंगरी- कुंभार्डा ते खोपरा रस्त्याचे आरक्षण आहे. उत्तन चौक येथील ऐतिहासिक जंजिरा धारावी किल्ला परिसर आहे. तसेच नेहमी वाहतूक कोंडी होर्णाया बोस मैदान ते भाईंदर पश्चिम रेल्वे स्थानकापर्यंतच्या ३० मीटर रुंद रस्त्याचे आरक्षण आहे. एकूण ४ लाख १८ हजार ७४५ चौरस मीटर क्षेत्र मीठ विभागाच्या अखत्यारीत असून या जागांवर महापालिकेकडून विविध आरक्षणांच्या माध्यमातून विकासकामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. आता या जागा हस्तांतरण करण्यास मीठ विभागाने मान्यता दिली आहे. तसेच या जागेच्या बाजार मुल्यापैकी केवळ १० टक्केच मूल्य पालिकेकडून देण्यात येणार असल्याचे पत्र पालिकेने राज्य शासनाच्या माध्यमातून मीठ विभागाला दिले होते. त्याला देखील मंजुरी दिली असल्याचे सांगण्यात आले आहे.

## एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाचे नेतृत्व लवकरच आयपीएस अधिकाऱ्याकडे

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाला अखेर कणखर नेतृत्व मिळणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी या महत्त्वाच्या पदावर लवकरच आयपीएस दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती होणार आहे. फेब्रुवारी महिन्यात स्वारगेट येथे घडलेल्या महिला अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण राज्य हादरले होते. त्या पार्श्वभूमीवर एसटीच्या सुरक्षा यंत्रणेतील ढिसाळपणा उघड झाला. त्यावेळी मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी पद वर्षानुवर्षे रिक्त असल्याचे समोर आले. त्यावेळी परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटीला लवकरच आयपीएस दजार्चा अधिकारी मिळेल, असे आश्वासन दिले. त्या आश्वासनाची पूर्तता आता प्रत्यक्षात येणार आहे. एसटी महामंडळाच्या पाठपुराव्याला राज्याच्या गृह खात्याने हिरवा कंदील दाखवला आहे. मुख्यमंत्र्यांनी या नियुक्तीस मान्यता दिल्याने लवकरच एसटीच्या सुरक्षा व दक्षता विभागाला अनुभवी, शिस्तप्रिय व कुशल आयपीएस अधिकारी प्रमुख म्हणून मिळणार आहे.

## वसई -विरार महापालिकेने तयार केले ८७ तात्पुरते फेरीवाला झोन



**फेरीवाला धोरणाचा ठराव'**

सप्टेंबर २०१९ च्या झालेल्या महासभेपुढे फेरीवाला धोरणाचा ठराव मंजूर करण्यासाठी ठेवण्यात आला होता. या ठरावामध्ये प्रस्तावित क्षेत्रांची प्रभागनिहाय झोन निश्चित करण्यात आले होते. मात्र त्यावेळी पालिकेवर असलेले सत्ताधारी तसेच विरोधकांतर्फे निश्चित केलेल्या झोनला विरोध करण्यात आला आणि ठराव स्थगित झाला होता.

■विरार। प्रतिनिधी,

वसई-विरार महापालिकेने सात वर्षानंतर ८७ ठिकाणी तात्पुरते फेरीवाला झोन तयार केले आहेत. यामुळे शहराच्या वर्दळच्या ठिकाणी अतिक्रमण करून बसताना मांडलेल्या फेरीवाल्यांना आता पालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी बसावे लागणार आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न तात्पुरत्या स्वरूपात सुटणार असल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. वसई-विरार शहरात फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर झाला होता.

महापालिकेच्या हद्दीत फूटपाथ, रस्त्याच्या कडेला, गर्दीच्या ठिकाणी, मोकळ्या परिसरात कपडे, मोबाइलचे साहित्य, भाजीविक्रेते, फळ विक्रेते यांच्यासह विविध सामान विक्रेत्यांनी रस्त्यावर बस्तान मांडला होते. यामुळे नागरिकांना चालणे बेताचे होत चालले होते. यामुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण येत होता. पालिकेतर्फे धोरणात्मक कोणताही निर्णय न झाल्याने फेरीवाला धोरण सात वर्ष बारगळले होते. कोरोना वैश्विक महामारीच्या काळात वसई विरारमधील फेरीवाल्यांची संख्या लाखोच्या घरात गेली असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे शहरात मिळेल त्या ठिकाणी या फेरीवाल्यांनी आपले बस्थान मांडले होते. फेरीवाले धोरण निश्चित केल्यानंतर वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटून पालिकेच्या उत्पन्नात भर पडेल असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. यामुळे वसई विरार महापालिकेने ८७ ठिकाणी तात्पुरते फेरीवाला झोन निर्माण केले आहेत.

**२०१४ मधील फेरीवाल्यांची संख्या**

राज्य सरकारचे सन २०१४ मध्ये शहरांमधील ह्राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करावे असे आदेश होते. त्यानुसार फेरीवाल्यांचे सर्वेक्षण बायोमेट्रिक पद्धतीने वसई -विरार पालिकेने पूर्ण केले होते. यामध्ये १२ हजार ७६८ स्थिर फेरीवाले आणि २ हजार ३८८ अस्थिर फेरीवाले यांची नोंद करण्यात आली होती.

**पीएम स्वानिधी योजना काय?**

पीएम स्वनिधी योजना ही भारतातील एक स्वयं-रोजगार योजना आहे. जी लघु विक्रेत्यांना आणि पथ विक्रेत्यांना कर्ज देण्यावर लक्ष केंद्रित करते. या योजनेच्या माध्यमातून लघु आणि मध्यम व्यापारी आपला व्यवसाय वाढवू शकतील आणि त्यांचे आर्थिक जीवन सुधारू शकतील.

## किरकोळ अपराधासाठी आता फक्त दंड, तुरुंगवास नाही... ७ कायद्यांतील छोटे गुन्हे 'डिक्रिमिनलाइज'

**५ विभागांतील ७ राज्य कायद्यांमध्ये सुधारणा प्रस्तावित**

कामगार, महसूल, वित्त, वैद्यकीय शिक्षण व औषध प्रशासन आणि सार्वजनिक आरोग्य या पाच विभागांतील सात राज्य कायद्यांमध्ये सुधारणा प्रस्तावित आहेत. या अंतर्गत खालील कायद्यांतील किरकोळ दंडात्मक तरतुदी हटवणे, बदलणे किंवा अधिक तर्कसंगत बनवणे प्रस्तावित आहे:

- महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६
- महाराष्ट्र कामगार संघटना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१
- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशतीर्चे विनियमन) अधिनियम, २०१७
- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८
- महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५
- महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम,१९७५
- महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९

■ठाणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्र मंत्रिमंडळाने मंगळवारी ७ राज्य कायद्यांमधील किरकोळ अपराध डिक्रिमिनलाइज (गुन्हेगारी स्वरूपातून वगळण्याचा) करण्याचा अध्यादेश मंजूर केला. या निर्णयामुळे राज्यातील नागरिक आणि व्यावसायिकांना छोट्या तांत्रिक चुकांमुळे गुन्हेगारी कारवाईचा सामना करावा लागणार नाही. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हा निर्णय नागरिक आणि उद्योग क्षेत्रासाठी शासन नियम अधिक सोपे आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे.

**'महाराष्ट्र जनविश्वास' अध्यादेश**

महाराष्ट्र जनविश्वास (तरतुदींमध्ये सुधारणा) अध्यादेश २०२५ अंतर्गत, नागरिक, व्यापारी आणि सेवा पुरवठादारांवरील अनावश्यक कायदेशीर बंधने कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. या माध्यमातून शासन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि नागरिकांचा शासनावरचा विश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हा अध्यादेश केंद्र सरकारच्या 'जन विश्वास अधिनियम २०२३' च्या धर्तीवर तयार करण्यात आला असून, राज्यातील नियम अधिक सोपे आणि सुलभ बनवण्याचे उद्दिष्ट आहे.



**किरकोळ गुन्हा – आता दंड, तुरुंगवास नाही**

नवीन चौकटीत किरकोळ प्रक्रियात्मक उल्लंघनांसाठी तुरुंगवासाऐवजी दंड किंवा प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. उदा., परवाना नूतनीकरणात उशीर होणे, नोंदी ठेवण्यात झालेल्या किरकोळ चुका किंवा कागदपत्रांतील त्रुटींसाठी तुरुंगवास यासारख्या फौजदारी शिक्षेऐवजी आर्थिक दंड किंवा प्रशासकीय कारवाई केली जाईल.

**'विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी'शी करार**

राज्य सरकारने कायद्यांचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि शिक्षा कमी करण्यासारख्या तरतुदी ओळखण्यासाठी 'विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी' या विख्यात संस्थेशी करार केला आहे. या संस्थेने आतापर्यंत राज्यातील ३१ कायद्यांचे परीक्षण केले असून, त्यापैकी २६ कायद्यांमध्ये सुधारणा किंवा डिक्रिमिनलायझेशनची शिफारस करण्यात आली आहे.

**छोट्या चुकांसाठी तुरुंगवासाच्या भीतीने जगू नये**

अधिकाऱ्यांनी सांगितले की या उपक्रमामुळे नागरिकांवर आणि लहान व्यवसायांवरील भार कमी होईलच, शिवाय न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या किरकोळ खटल्यांची संख्या कमी होण्यासही मदत होईल. ''लोकांनी छोट्या चुकांसाठी तुरुंगवासाच्या भीतीने जगू नये,'' असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. ''यामागील कल्पना अशी आहे की अशी व्यवस्था तयार करावी जी नागरिकांवर विश्वास ठेवते आणि शिक्षेपेक्षा अनुपालनावर लक्ष केंद्रित करते.''

**अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यास सुरुवात**

राष्ट्रीय पातळीवर कॅबिनेट सचिवालयाने 'डीरेग्युलेशन सेल' आणि टास्क फोर्स स्थापन करून राज्यांमधील सुधारणा अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या मुख्य सचिवांच्या परिषदेत, प्रशासकीय कायद्यांतील अनावश्यक गुन्हेगारीकरण कमी करण्यासाठी राज्यांना तातडीने कायदेशीर सुधारणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

## वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या गॅरेज फेरीवाल्यांवर वाहतूक पोलिसांची कारवाई

■मिरारोड। प्रतिनिधी,



मिरा-भाईंदर शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्याच्या दृष्टीने काशिमीरा वाहतूक पोलिसांकडून शहरात रस्त्यावर अतिक्रमण करत वाहतूकीला अडथळा निर्माण करर्णाया गॅरेज चालक, फेरीवाले यांच्यावर कारवाई करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. जवळपास गेल्या एक महिन्या ासून कारवाई करत १५० हून अधिक गॅरेज, फेरीवाले यांच्यावर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती काशिमीरा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी दिली आहे. काशिमीरा वाहतूक विभागामार्फत मिरा- भाईंदर शहरातील भाईंदर, नयानगर, काशिमीरा, मिरारोड, नवघर या परिसरात रस्त्यावर वाहने दुरुस्त करर्णाया गॅरेज चालक याच बरोबर फेरीवाले यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.रस्त्यावर अतिक्रमण केल्याने वाहनांना अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. त्यामुळे वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरर्णाया गॅरेज आणि फेरीवाले यांच्यावर कलम १०२/ ११७ नुसार कारवाईला सुरूवात करण्यात आली आहे.नोव्हेंबर महिन्यात तीन दिवसात एकूण २१ केसेस करण्यात आल्या असून एकूण १८५ हून अधिक केसेस करण्यात आल्या आहेत. सदर कारवाई मोहीम अशीच चालू राहणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितले आहे.

## मिरा-भाईंदर महापालिकेच्या सरळसेवा पदभरतीला स्थगिती

**महापालिकेच्या भरती विरोधात याचिका**

मिरा -भाईंदर महानगरपालिकेच्या सरळ सेवा भरतीविरोधात महाराष्ट्र अग्निशमन सेवा महासंघ आणि कंत्राटी फायरमन यांनी कामगार न्यायालयात याचिका दाखल करत अग्निशमन विभागात गेल्या ६ ते ७ वर्षांपासून फायरमन या पदावर काम करर्णाया १०० प्रशिक्षित कर्मचारी यांना पालिका सेवेत सामावून घेण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. तसेच सदरील कर्मर्चायांनी कोविड -१९ ह्या अशा जीवघेण्या महामारीच्या काळात सुद्धा जीवाची पर्वा न-करता कर्तव्यावर हजर राहून महापालिकेच्या आदेशानुसार प्रतिबंधित क्षेत्रात जाऊन औषध फवारणी व क्वारंटाईन सेंटर येथे आणि रुग्णालयात तिनी पाळी मध्ये काम केल्याने त्यांना सेवेत पालिका सामावून घेण्याची मागणी याचिका दाखल केली आहे. मात्र त्यावर सद्यस्थितीत स्थगिती आदेश नसल्याची माहिती मिळाली आहे.

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा-भाईंदर महापालिकेच्या सरळसेवा पदभरतीला स्थगिती देण्यात आली आहे. पालिकेची ३५८ जागांसाठी पदभरती सुरू होती. त्यासाठी पालिकेची पदभरती सूचना जाहीर करण्यात आली होती. त्यात नमूद शैक्षणिक पात्रता धारण करर्णाया व अटीशतीर्ची पूर्तता करर्णाया उमेदवारांनी महापालिकेच्या आस्थापनेवरील गट-क संवगार्तील रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्यासाठी सदरील जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यासाठी मे.टाटा कन्सल्टंसी यांची निवड करण्यात येऊन त्यांना त्या भरतीचे पैसे अदा करून त्यानंतर कागदपत्रे तपासून पात्र विद्यार्थ्यांच्या महाराष्ट्र राज्यात विविध जिल्ह्यात परीक्षा घेण्यात आल्या होत्या. याबाबत भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे स्थिगितीची मागणी केली होती. त्यानंतर आता सरळसेवा पदभरतीवर नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना महापालिकेचे सेवा प्रवेश नियम मान्य होत नाहीत तोपर्यंत स्थगिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने २१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) २७ पदे, कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) २ पदे,



कनिष्ठ अभियंता (विद्युत) १ पद, लिपिक टंकलेखक ३ पदे, सर्व्हेअर (सर्वेक्षक) २ पदे, प्लंबर २ पदे, फिटर १ पदे, मिस्त्री २ पदे, पंपचालक ७ पदे, अनुरेखक १ पद, वीजतंत्री (इलेक्ट्रिशीयन) १ पद, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर, संगणक प्रोग्रामर १ पद, स्वच्छता निरीक्षक ५ पदे, चालक झ यंत्रचालक १४ पदे, सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी ६ पदे, अग्निशामक २४१ पदे, उद्यान अधीक्षक ३ पदे, लेखापाल ५ पदे, डायलिसिस तंत्रज्ञ ३ पदे, बालवाडी शिक्षिका ४ पदे, परिचारिका / अधीपरिचारिका ५ पदे, प्रसविका १२ पदे, औषध निमार्ता, औषध निर्माण अधिकारी ५ पदे, लेखापरीक्षक १ पद, सहाय्यक विधी अधिकारी २ पदे व तारतंत्री वायरमेन १ पद आणि ग्रंथपाल १ पद असे मिळून ३५८ पदांसाठी सरळ सेवा पद्धतीने भरतीची जाहिरात महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी प्रसिद्ध केली होती. ही संपूर्ण पद भरती ही अन्यायकारक असल्याची तक्रार भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करत स्थगिती देण्याची मागणी केली होती.

## २२० सीसीटीव्हींच्या आधारे ६ वर्षीय मुलाचा लागला शोध

■विरार। प्रतिनिधी,

नायगाव पोलीस ठाणे हद्दीतून अपहरीत झालेल्या सहा वर्षांच्या मुलाचा शोध घेऊन त्यास सुखरूपपणे आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात नायगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे.

२४ ऑक्टोबर २०२५ रोजी पाचोरीपाडा, चिंचोटी, नायगाव (पूर्व) येथील ६ वर्षीय मुलगा राहत्या घरातून रागाच्या भरात घराबाहेर पडला होता. त्यानंतर अज्ञात इसमाने त्याच्या अज्ञानपणाचा फायदा घेत फूस लावून त्याला पळवून नेल्याची तक्रार मुलाचे वडील अविनाश रतनलाल गिरी (वय ४१) यांनी नायगाव पोलीस ठाण्यात केली होती. याबाबत गुन्हा क्रमांक ५५६/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणाची गंभीर दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेची दोन स्वतंत्र पथके तयार करून शोधमोहीम सुरू केली. तपासादरम्यान पथकाने साष्टीकरपाडा, कामन, वसई, नालासोपारा, दादर आणि महालक्ष्मी रेल्वे स्टेशन परिसरातील अंदाजे २०० ते २२० सीसीटीव्ही फुटेज तपासले. अखेर पथकाने सदर मुलगा महालक्ष्मी (मुंबई) परिसरात सापडून त्यास सुरक्षितपणे ताब्यात घेतले. नंतर त्याला त्याच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले.

या गुन्ह्याचा तपास सपोनि. मनीषा पाटील यांनी केला असून ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, उप पोलीस आयुक्त (परिमंडळ २) पौर्णिमा चौगुले, सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे, व पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या यशस्वी कारवाईत सपोनि. गणेश केकान, मसपोनि. मनीषा पाटील, पोउपनिरीक्षक ज्ञानेश्वर आसबे, अनिल मोरे, तसेच पोहवा शेखर पवार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, अनिल बोडके, चेतन ठाकरे, सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, अशोक पाटील, पाडुरंग महाले आणि विशाल ढेपले यांनी मोलाची भूमिका बजावली. पोलिसांच्या तत्पर आणि समन्वयपूर्ण कारवाईमुळे सहा वर्षांचा बालक सुरक्षितपणे पालकांच्या स्वाधीन झाला असून नागरिकांकडून पोलिसांच्या कायार्चे कौतुक होत आहे.

## अश्लील नृत्यप्रकरणी ६ जणांवर गुन्हा

### वर्षा व्हिला बंगल्यातून १९ लाखांचा मुद्देमाल जप्त

■पाचगणी। प्रतिनिधी,

महाबळेश्वर-पाचगणी पर्यटन पट्टयातील खिंगर गावाजवळील 'वर्षा व्हिला' बंगल्यावर पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकून सुरू असलेले अश्लील नृत्य उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी बंगला मालकासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून सुमारे १८ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पाचगणी पोलिसांना बंगल्यात 'गायिका' व 'महिला वेटर' म्हणून आणलेल्या बारबाला संगीताच्या तालावर उत्तान कपड्यांमध्ये नाचवले जात असल्याची माहिती मिळाली होती. या पार्श्वभूमीवर सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर आणि



उपविभागीय अधिकारी सुनिल साळुंखे यांच्या निर्देशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप पवार यांनी सोमवारी मध्यरात्री एक वाजता छापा टाकला. छाप्यावेळी बंगल्यात सहा बारबाला सुमारे पाच ते सात गिऱ्हाईकांसमोर अश्लील हावभाव करत नृत्य करताना पोलिसांना दिसल्या. ग्राहक आणि बारबाला परस्पर लगट करत असल्याचेही दिसून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून पाच जणांना अटक केली, तर बंगला मालकासह एकूण सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## कल्याणहून पंढरपूरला जाणारी खासगी बस उलटली

### अपघातांनातर चालकाचे घटनास्थळावरून पलायन

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

कल्याण येथून पंढरपूरकडे निघालेल्या खासगी ट्रॅव्हल्स बसचा अपघात ठाणे-बेलापूर मार्गावर कोपरखैरणे येथे झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस रस्ता दुभाजकाला धडकून पलटी झाल्याने हा अपघात घडल्याचे म्हटले जात आहे. या अपघातात चार प्रवासी किरकोळ जखमी झाले असून, अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. या बसमध्ये सुमारे ३० प्रवासी होते.

रात्री साडेनऊच्या सुमारास बस ठाणे-बेलापूर मार्गावर कोपरखैरणे येथे पोहोचली असताना, भरधाव वेगात असलेल्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे बसने रस्ता दुभाजकाला जोरदार धडक



दिली आणि त्यानंतर ती उलटून रस्त्याच्या कडेला पलटी झाली. अपघातानंतर चालक संभाजी मानेने कोणत्याही प्रकारची मदत न करता घटनास्थळावरून पलायन केले.

घटनेची माहिती मिळताच तुर्भे पोलीस आणि वाहतूक विभागाचे अधिकारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने बसमधील प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. जखमी प्रवाशांमध्ये स्मिता चौधरी (३५), वैजयंता साबळे (६२), सुजाता कांबळे (४०) आणि रघुनाथ सोनवले (५७) या चौघांचा समावेश असून, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक चौकशीत बसचालकाने भरधाव वेगात निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळे अपघात झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com